म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९५४.
१८७४

६२
काव्य.

# ...वप्रकाश.

कृष्णशास्त्री राजवाडे.

यांनीं केला

तो

पुणेयेथें

सुविद्याप्रकाश

छापखान्यांत छापिला.

शके १७९६.

नं ६२ म. ग्रं. सं. ठाणें 62
सन १८७४
विषय काव्य
लेखक कृष्णशास्त्री राजवाडे
संग्रहालय क्रमांक ९५४ ९५४
पुस्तकाचें नांव उत्सव प्रकाश

# उत्सवप्रकाश.

कृष्णशास्त्री राजवाडे.

ह्यांनीं केला

तो

पुणेयेथें

सुविद्याप्रकाश

छापखान्यांत छापिला

शके १७९६.

सन १८७४.

---

ग्रंथकर्त्यानें.

सन १८४७ चा आक्ट २० व सन

१८६७ चा अ[illegible] प्रमाणें राजिस्टर

केलें

# प्रस्तावना.

---

कोणत्याही भाषेची पूर्णपरिपाकावस्था झटली ह्मणजे कविता होय देशो देशीं ज्याज्या भाषा आहेत त्यांत कविता आहेत ज्यांस उत्तम रीतीनें भाषा ज्ञान असतें त्याचीच कविता सुरस व सर्व संमत होते सरस कविता होण्याचीं कारणें तीन आहेत. एक कारण कविता करण्याचा अतःकरणावर कांहीं एक स्वाभाविक संस्कार, दुसरें कारण व्यहार दर्शन आणि अनेक शास्त्रांतील गद्य पद्यात्मक ग्रंथाचें दर्शन, तिसरें कारण काव्यज्ञाच्या शिक्षेनें कविता करण्याचा अभ्यास. कविता हें एक मनोरंजनाचें मोठेंच साधन होय. पूर्वीं मुकुंद राज, ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम वामन पंडित, रामदास, मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत रघुनाथपंडित रामजोशी, आनंद तनय, महीपातिबावा, रुकमंणा पंडित, रंगनाथ, अत्या स्वामी अमृतराव इत्यादिक बहुत कवि होऊन गेले. ह्यांच्या कविता सर्वांस मान्य व आनंदप्रद आहेत, गद्यात्मक कविते पेक्षा पद्यात्मक कविते पासून फार मनोरंजन होत असतें कारण पद्यात्मक कवितेंत शृंगार, वीर, करूण इत्यादि करस. व अलंकार आणि अनुप्रासयमकें असतात त्या पासून वाचणारास फार आनंद होतो. पूर्वीं जे मोठ मोठे कवि झाले त्यांच्या पद्यात्मक कविता अत्यंत मनोरंजक पुष्कळ आहेत परंतु सांप्रत ह्या परमोपकारक सरकारानें नूतन पद्यात्मक कविता करणाऱ्यास बक्षीस देण्याचा ठराव केल्या पासून कविता करण्याचें उत्तेजन येऊन बरेच लोक पद्यात्मक कविता करूं लागले आहेत ही एक गोष्ट मोटया आनंदाची आहे सुमारें च्यार वर्षां पूर्वीं मेहरबान दाक्षिणा प्रैज कमिती हिनें सणाचें वर्णन ह्या विषयावर सुरस कवितावद्ध ग्रंथ करणारास ४०० रुपये बक्षीस देण्याची जाहिरात दिल्यावरून लोकां कडून बहुत ग्रंथ आले त्या पैकी जे दोन ग्रंथातिला पसंत झाले त्या पै[illegible] प्रतीचा होय यांत वर्षामध्यें जे मुख्य सण येत [illegible] हे यांत शृंगार, [illegible] क-

रुण, हास्य इत्यादि अनेक रसांचा परिपाक कवीनें आर्विर्भावास चांगला
आणिला आहे व जागोजागीं उपमादिक अलंकार व काव्यांत गुण जे
असावे ते फार चांगले योजिले आहेत असें रसिक जनांच्या ध्यानांत ये-
ईल. या ग्रंथाचें नाव उत्सवप्रकाश ठेविलें आहे कठिण शद्बाचा अर्थ बोध
होण्यासाठीं खालीं टीपा लिहिल्या आहेत. सणाच्या वर्णनाचा ग्रंथ आज
पर्यंत महाराष्ट भाषेत झाला नव्हता तो आतां नवीनच झाला आहे ह्मणून
यांत काहीं फेरफार करावा लागेल हें खरें परंतु प्रथम नवीन कृति कर-
ण्यास प्रयास किती आहे हें मनांत आणून जे रसिक विद्वज्जन आहेत ते
ह्या ग्रंथास आश्रय देतील अशी आशा आहे.

का०५
223

# सणाचेंवर्णन.

—०—

## मंगल श्लोक.

जो सर्वज्ञ सुशक्तिनेंच अवघ्या निर्मूनि विश्वाप्रति
पाळी उत्सव देउनी न सदया विश्वंभरा त्या प्रती ॥
ध्याघ्या सौख्य ह्मणोनि सर्व सण हे केले जयानें तया
माझ्या ह्या प्रणती असोत शतशा सौख्याचिया दातया ॥ १ ॥

## पाडवा शार्दूल वि०

चैत्रारंभतिथी महासण असे हा पाडवा या दिनीं
श्रीमंत्तीण सुवासिनीच दिसते आनंदिता मेदिनी ॥
कांता कुंकुमरंगवल्लि हळदी घालोनि शृंगारिती
भूमीला विखरोनि पुष्पततिही गंधाक्षतें पूजिती ॥ २ ॥
जागे व्हा, नधरा तुह्मी तिळभरी आलस्य नारीनर
वर्षारंभ अजी महासण उठान्हावोनिया सत्वर
अत्युच्चा गुढिया उभ्या करूनिया पूजा तयांची करा
सारें वर्ष सहर्ष जाइल तुह्मा आनंद आजी धरा ॥ ३ ॥
शोले उन्नत यष्टिला भरजरी शाली, जरीचे खण
बांधोनी लुगडीहि उंच, करिती कोणी ध्वजारोपण ॥
गाठया घालुनि गंध पुष्प हळदी कुंकूवरी वाहती
स्त्रीपुत्रादि परस्परें निजजनां डोळे भरी पाहती ॥ ४ ॥
अत्युच्च ध्वज लक्षशा घरि घरीं प्रोत्तुंग सौधावरी
होती, तत्पट हालती फड फडा विस्तीर्ण पंख्यापरी ॥

---

१ उपमा.

२।
का०

## पाडवा.

जाणो सर्वसणांत भूपतिच हा आला असे पाडवा
सन्मानार्थाचि भूप्रदेश जणु हा जातो तया आडवा ॥ ५ ॥
वर्षांतूनि अनेक वार जरि हा येईल लोकीं सण
त्याचा आदर थोडकाहि नकरूं कोणीच हो आपण ॥
ज्ञात्यानें न घडोघडी परगृहीं जावें, ह्मणोनीच हा
येवोनी सण एकवाराचि, बहू सन्मान पावे पहा ॥ ६ ॥

## स्त्रग्धरावृत्त.

कंठी तूं श्रीधरा घे, मणिजडित मुद्री माधवा तूजलाही
पोंची कृष्णा तुलाही, अतुल चवकडा शंकरा तूंचिवाही ॥
पागोटें पैठणी हें तुज बहु हिरवें शोभतें वासुदेवा
घाली तूं बोलताती वडिल निजसुतां लौकरी आजि जेवा ॥ ७ ॥
पेव्या वांकी सरीही जडित बिजवरा कांकणें सोनियांची
कंठा पट्टा मुद्रा, हा जडित तनमणी भूषणें ही हिऱ्यांची ॥
साऱ्या कन्या सुनाही घरिं घरिं घरूनी शोभती देवताशा
मोठ्या दैवें सणीं ह्या धनिक सुतसुना पावती सर्व आशा ॥ ८ ॥

## शार्दूल वि०

मोटे वैदिक पंडित प्रथित जे जोशी महा श्रोत्रिय
येवोनी धनिक गृहांत वदती गोष्टी विचित्र प्रिय ॥
तैसे गायक वादक प्रवरही वस्त्रें बहू भूषणें
लोकीं पावति पाडव्यास करितां श्रीमन्मनस्तोषणें ॥ ९ ॥
वर्षाचें फळ वाचती घरिं घरीं दैवज्ञ येऊनिया
पंचांगस्थ गणेश पूजुनि तुह्मी पावाच लोकीं जया ॥
भक्षा लिंब असें ह्मणोनि, वदती आधी कडू हा असे

## पाडवा.

पर्यंतीं गुण फार यांत असती व्याधी लया जातसे ॥ १० ॥
आधीं होय कडू परी बहु गुणें जें शेवटीं गोड तें
सेवावेंच. असें घडोघडि बहू हें शास्त्रही सांगतें ॥
विद्या, नीति, सुसंगती, फळबहूदे औषधी शेवटीं
या साठी कडु लिंब घ्या परिणती[1] याची असे गोमटी ॥ ११ ॥

## भुजंग प्रयातवृत्त.

मुलानो अजी सर्वना हासकाळीं, तुह्मी केशरी गंध लावा कपाळीं ॥
करीं कंकणें मुद्रिका पुंज राहो, दुपट्टे शिरीं मंदिलातें धराहो ॥ १२ ॥
अरे केशवा माधवा बाळक्यारे, त्वरें ऊठ घेऊनि पंचांग जारे ॥
वदायास संवत्सराच्याफळातें, पहा जाति जोशी धनींच्या गृहातें ॥ १३ ॥
अरे भिक्षुकीजन्म हें आपुलेंकीं, करी नें पितातें आदरावेंचि लेकीं ॥
असे भिक्षुकीनेंच निर्वाह सारा, मुलें लेकरें केवढा हा पसारा ॥ १४ ॥

## शार्दूल वि०

पागोटें धरि चुंबळी परि शिरीं, कोका कमानी परी
खोवी जर्जरसें तयांत अपुलें पंचांग, खांद्यावरी ॥
कंदी शेलगठास घेउनीनिघे. जोशी त्वरें आपण
प्रत्येका सदनांत सांगत फिरे धुंडी समग्रापण[2] ॥ १५ ॥
गाठोडी भरुनी सधान्य खुरदा घेऊनि जोशी घरीं
येती मोट भरोनि घेऊनि शिधे, आनंदती अंतरीं ॥
जोशीणी ह्मणती तया, झडकरी आंघोळ तूह्मी करा
जाजा लौकरि भोजना, निवतणें आलें, त्वराहो करा ॥ १६ ॥
नान्या आणि गण्या विशासदुजन्या मोन्या विठ्या हा हरी

---

१ परिणाम २ सर्व बाजार.

## पाडवा.

जाती सर्वांहि भोजनास अपुल्या हे मावशीच्या घरीं ॥
माहेरी अपुल्या मुली सकळ ही जाती, सवाशीण मी जाते
भात करोनि अर्पण करा देवास आतां तुह्मी ॥ १७ ॥
जोशी आणि भटास होयव हुशा बाहेर सारासण
लोभें ते बहु बद्ध होति, पशुसे पावूनिया वेसण ॥
वाहोनी बहु भार जेवुनि सदा अन्य गृहीं पावती
सौख्या तें मज नावडेच हलकी ही भिक्षुकाची स्थिती ॥ १८ ॥
संसारी जन रोजगार करिती त्यांणीं सणाचें सुख
घ्यावें, हेंचिखरें, न भिक्षुक जनीं, जे सर्वदा दुर्मुख
वाहोनी श्रम एक एक कवडी संपादुनी दीनता
दावोनी, नच भोगिती, धरूनिया लोकामधें हीनता ॥ १९ ॥
रात्रीं गायक गाति आढय सदनीं वारांगना नाचती
वीणा टाळ मृदंग कोमल रबा सांरंगिया वाजती ॥
बाजे मंजुळ सारमंडळ बहू आलापिती रागिणी
ताना घेति तना तनांन तननं श्री मद्गृही कामिनी ॥ २० ॥

## वसंत तिलका.

इच्छी पुरंदर पदास चढावयाला, नामें
वसू नृपति जाय तपोवनाला
त्याच्या तपें करूनियां बहु तुष्ट झाले
भूपा श्रमांत सुर सर्व मिळोनि आले ॥ २१ ॥
त्याला पुरंदर ह्मणे अमरेंद्र आहें
स्वर्गींत मी असाशि तूं मनुजेंद्र, राहे
पृथ्वीवरी करूनि धर्म, तुझ्याचि योगें
राहोत सर्वजन होउनि तुष्ट भोगें ॥ २२ ॥

## पाडवा.

काळें करूनि मग येशिल पुण्य लोकां
देवोनि सर्व सुख भूमिवरील लोकां
माझी स्मृती नरवरा करशील जेव्हां
येईन सत्वर तुझ्या जवळींच तेव्हां ॥ २३ ॥
देतों विमान तुज, मत्ध्वज हातसाच
माला सुवर्ण कमल ग्रथिताहि साच
कंठीं धरूनि बहु शोभसि, मानवेंद्र
मी जेवि शोभत असें अमरांत इंद्र ॥ २४ ॥
आज्ञा ह्मणोनिं मग त्या वसुनें ध्वजातें
अत्यादरें करुनि पूजियलें स्वहातें
सारे तदादि करिती ध्वजपूजनाला
संवत्सर प्रतिपदा सुखदे जनाला ॥ २५ ॥
संवत्सर प्रतिपदेस महा मतोनें
केला असे ध्वज उभा वसु भूपतीनें
जे श्रेष्ट आचरिति, मानुनि सर्व लोक
तें आचरी, तरिंच होय बहू विशोक ॥ २६ ॥
जे राजचिन्ह जन आदर पूर्व त्यातें
पूजूनि, पावति सदाहि बहू सुखातें
भूप ध्वजास पुजितां प्रति वर्षि झाला
संवत्सर प्रतिपदा सण हा जनाला ॥ २७ ॥

## अक्षय तृतीया.

### इंद्रवज्रा.

चैत्रामधें अक्षय ही तृतीया
आहे सणाची तिथि हे, तुह्मी या
श्राद्धास ऐसें ह्मणतां भटाला
वाटे दिवाळी सण काय आला ॥ १ ॥
श्राद्धास, बाळं भट याल ? नाहीं
आमंत्रणाची गरदीच, कांहीं
साधे नका, तों मग हूं ह्मणाया
चिंता नसे, सांगुनि तें, ह्मणा, या ॥ २ ॥
केळी करा आणिक खीर आहे
दे ताव झोडूनचि दक्षिणा हे
तो बोलतो खीर तुह्मीच खाहो
आह्मास तों पुष्कळ दक्षिणाहो ॥ ३ ॥
घेवोनि हातीं घट एक एक
सोत्सा ह्वेगें भट हे अनेक
अन्योन्यगीजी अपुली कमाई
सांगोनियां दर्शविती बढाई ॥ ४ ॥

# हळद कुंकू.

## शार्दूल वि०

गौरी आजचि बैसताति अमुच्या यावें घरीं भोजना
बोलावूनि सुवासिनीस मुदिता अन्योन्य ह्या अंगना
उत्साहें करिती बहूत हळदीं कुंकू, थव्याचे थवे
नारीचे निघती, सुशोभित किती हे भूषणें आघवे ॥ १ ॥
चैत्रीं होय घरोघरीं हि हळदी कुंकू, समारंभ हा
गौरीचा करिती स्त्रिया सकळ ही, उत्साह होतो महा
लावोनी अरसे गलास झुमरें चित्रें पुढें मांडिती
कारंजी किति उंच उंच नलिका लावोनिया सोडिती ॥ २ ॥
साच्यानेंच अनेक रंग भरुनी रांगोळिया घालिती
हंड्या लख्ख चिराकदान समया गौरी पुढे लाविती
तक्के लोड बिछायती पसरती पाहोनिया वाटतें
कीं कैलास चिखाल्तें उतरुनी गौरी पुढें थाटतें ॥ ३ ॥
रावूमोर सुरम्य कुक्कुट किती हे हंस हे सारस
हे पारावत चक्रवाक पिक हे आहेत संद्राग्रस
कारागीर बहूत धन्य, रचिले पक्षी जयानें असे
कीं जातील उडोनि सत्वर अशी शंकामनीं येतसे ॥ ४ ॥
कोणी कुंकुम घेतसे हळदही, ओंटी भरी दूसरी
कोणी देइ विडेच, गंध दुसरी लावी, करी कूसरी
पुष्पें आणि खिरापती हि दुसरी वाटी बहू आदरें
येती ज्या वनिता तयांस बसवी अन्या धरोनी करें ॥ ५ ॥
बाईकां अमुच्या घरीं न हळदी कुंकास आला, असें
एक स्त्री इतरेस पूसत असे, ती बोलते, मी असें

---

१ ज्यांच्या वाणीची गोडी उत्तम आहे.

## हळद कुंकू.

कामा माजि, न मोकळीक मजला, ताईस मी धाडिलें
होतें, त्या दिवसींच काम घरचें मामांजिनी काढिलें ॥ ६ ॥
जावायांस बहूत सांगुनि तुह्मी धाडून द्यावीहिणी
ते येतीलचि सांगतांन धरिती मानास, मोठे गुणी
आजोबाइस ही खिरापत तुह्मी नेऊन द्या, अंगना
अन्योन्या प्रति देति घेति हळदी कुंकू करीं चंदना ॥ ७ ॥
भाळीं कुंकुम बांगड्या गळसरी कंठीं करीं कंकणें
कानीं काप ठळक्क, थोरचि नथा नाना परी भूषणें
पायीं शोभति साखळ्या, चटचटा ही जोडवी वाजती
मूर्ती घेऊनिह्या अनेक, वनिता, गौरीचर्की साजती ॥ ८ ॥
शाली पांघरुनी कितीक निघती शेले जरीचे किती
कन्या रंगित पांघरूनि फडक्या वेगें पदें टाकिती ॥
मेण्यानें कितिएक पायिंच किती गाडी मधें बैसती
जाती येति घडो घडीहि हळदी कुंकास रम्या सती ॥ ९ ॥
आहा, काय वदूं स्त्रिया सपतिका सौभाग्य सौख्यें कशा
इंद्राचें पद तुच्छ मानुनि पहा प्रत्यक्ष गौरीचशा
आनंदें फिरती समस्त मजला अंबाच ह्या दीसती
पावोनी सुख, शंकरासम सदा ज्या लेखिताती पती ॥ १० ॥
देतां सर्व सुवासिनीस हळदी कुंकू, मला वाटतें
गौरी दैवत हें धरोनि विविधा मूर्ती पुढें थाटतें
जेथें होत सुवासिनी बहु तिथें लक्ष्मी स्वयें थागते
त्या वांचूनि तिची वडील भगिनी पाठीप्रती लागते ॥ ११ ॥
या साठी स्वगृहीं कराच हळदीं कुंकू तुह्मा सांगतों
व्हाव्या सर्व सुवासिनी घरि घरीं, गौरीस हें मागतों
नेत्रें निर्मल ही असूनि विनवी भूपास वेत्री जसा
ज्ञात्याला सुचवीतसें शुभ पहा ऐसेंच मी ही तसा ॥ १२ ॥

## हळद कुंकू.

शेतें मांडुनि काकड्या खरबुजें अंजीर द्राक्षें किती
केळीं नारळ थंडगार कवले गौरी पुढे टेविती
पेढे ताट भरोनि गोड बरफी शुभ्रा तशी केशरी
घालोनी तबकांत मांडिति वधू लिंबे बहू साखरी ॥ १३ ॥
हत्ती, व्याघ्र, वराह, अश्व, महिषी, गाई, ससे, लांडगे
कोल्हे. वानर, अस्वलें, मृग, गवे, गेंडे बहु दांडगे
चित्ते, सामर, वन्य अन्य पशुही राजे शिपायी मुनी
गौरीची करिती अरास रमणी, चित्रें पुढे मांडुनी ॥ १४ ॥



ग्रंथालय

## नागपंचमी.

### चामर.

श्रावणांत शुक्ल पक्षि होय नागपंचमी
हा सण प्रसिद्ध लोक बोलताति आगमी
या तिथीस नाग पूजिताति सर्व अंगना
गाति नाचती बहूत पावताति रंजना ॥ १ ॥
मातिचा करोनि नाग त्यासभोंति नाचती
फेर घेउनी, सुरम्य नागिणीच दीसती
नाग चंदनें लिहूनिया नऊंच भिंतिला
पूजिती समस्त लोक आदरोनि रीतिला ॥ २ ॥
एक मेकिचा धरोनि हात ह्या सुवासिनी
नाचताति फेर घेउनी बहूत कामिनी
रम्यगंडकुंडलें हि मंद मंद हालती
गीत माधुरीस काय आयकोनि डोलती ॥ ३ ॥
श्वासें मुखीं कुरळकेश पुनः पुन्हाजे
येती, तिहीं वदन पद्म बहूत साजे
ह्या पद्मिनीच समजोनि अलीच येती
निश्वासगंध कमलाधिक काय घेती ॥ ४ ॥

### शार्दूल वि.

बाजूला पडताति हार गळती पुष्पेंहि वेणीतुनी
पायापासुनि नूपरेंहि पडती, श्रांता बहू होउनी
नारी खेळति फेरघेउनि, नव्हे क्रीडा पुरेशी पहा
अत्यंत श्रमतां मुखावरि किती आला असे घर्म हा ॥ ५ ॥
कोणी जाउनि वारूळास, पुजिती नागास, त्या मागती
पुत्र, श्री, यश, धान्य, लोक बहुतत्सेवेंमधे लागती

संग्रा. २९

## नागपंचमी.

देतां धूप सुगंध जाति कुसुमें, बाहेर तो येतसे
दुग्धातें पिउनी पहान करिता पीडा बिळीं जातसे ॥ ६ ॥
पाजा दूध ह्मणोनियां घरिं घरीं नागा प्रती आणिती
गारूडी मग लोक त्यास पुजिती दुग्धासही पाजिती
नागाला बहु धुग्द पाजूनि तुह्मी कल्याण घ्या साधुनी
त्याशीं लाड बरीक फार नकरा सेवा करा दूरुनी ॥ ७ ॥
संपत्ती जरि नाग देईल तरी कां मागती गारुडी
भिक्षां, कां असता तया श्रम बहू पोसावयाला कुडी
आहे व्यापक देव हे समजतां, नागास अन्यासवा
पूजोनी बहु सुज्ञ ते मिळविती लोकामधें वाहवा ॥ ८ ॥
लिंगाईत शिराळशेट ह्मणुनी वाणी, नृपानें तया
साडेतीन घडीस्व राज्य दिधलें संतुष्ट होऊंनियां
त्याणें तें सनदा करोनि दुबळया लोका प्रती वांटिलें
जों सत्ता आपुली असे तंव, पहा दानें चितें भोगिलें ॥ ९ ॥
लोकीं हा ह्मणकीं, अतूट घटिकेचें राज्य भोगूनयें
शौर्यानें मिळवूनि राज्य मगतें संरक्षिजावें नयें
बाजीराव शिराळ शेटचि जसा राज्यावरी आयता
बैसोनी नकरीनि रक्षण पहा झाला कसा चालता ॥ १० ॥
मातीचाच शिराळशेट करिती ह्या श्रावणी षष्ठिला
हा दृष्टांतचि बाजिराव नृप जो त्याला जनीं घेतिला
उद्योगा विण लब्ध जें पद तया स्थैर्य क्षणाचें नसे
शौर्यानें मति वैभवें मिळविलें तेचि स्थिरत्वें असे ॥ ११

# गणेशचतुर्थी.

## इंद्रवज्रा.

शुक्ला तिथी भाद्रपदीं चतुर्थी हेरंबसंतोषद, जे सुखार्थी
ते, पूजिताती गणनायकाला भीती कधीं ते नच अंतकाला ॥ १ ॥

## उपेंद्रवज्रा.

युधिष्ठिरानें गणनायकाची करोनि पूजा हरिली मनाची
असह्य पीडा, रिपुतें वधोनी गजाननाचा वर मेळवोनी ॥ २ ॥

## इंद्रवज्रा.

कृष्णास मोठा अपवाद आला तो ह्यासणानेंच जगीं उडाला
हे नारदाच्यावचनें तयानें केलें चतुर्थीव्रत सन्नयानें ॥ ३ ॥
सत्राजिताला मणि दीधला जो सूर्यें, प्रभा पाहुने तोचिलाजो
श्री कृष्ण मागेल ह्मणोनि त्यानें दिला प्रसेनास विचक्षणाने ॥ ४ ॥

## उपेंद्रवज्रा.

प्रसेन कंठीं धरुनी मण्यातें असे, हरी घेउनियां तयातें
करावयाला मृगयेस गेला, प्रसेन सिंव्हें वनिं मारियेला ॥ ५ ॥
मारुनि सिंव्हां प्रति जांबवतें घेवोनिया तो मणि शक्तिमंते
घेवोनिया तोरण पाळण्याला बांधूनि पावे बहु उत्सवाला ॥ ६ ॥
श्रीकृष्ण मागें परतोनि आला त्याचा जनासंशय फार झाला
याणें मणी तो हरिला वधोनी प्रसेन, घे, ती कृति सावरोनी ॥ ७ ॥
वृथापवादें बहु तप्त झालासंसैन्य रानीं मग कृष्णआला
प्रसेन सिंव्हें हत, जांबवतें मृगेंद्र ही तो हत, शौर्य वंतें ॥ ८ ॥

---

१ सूर्य.

## गणेशचतुर्थी.

पाहोनि हें ठेवि हरी जनातें बाहेर, तो आपण त्या बिळातें
जाऊनिया पाहुनि पालखाला मणीं मनीं विस्मित फार झाला ॥ ९ ॥
कन्या तिथें पालख हालवीते कृष्णास पाहूनिच मोहलीतें
म्हतात जों निद्रित तोंचि घ्यावा मणी, ह्मणे कूच तुह्मी करावा ॥ १० ॥
ऐकूनितद्वाक्य हसूनि कृष्ण शंखास तो वाजवि युद्धतृष्ण
तो ऋक्ष[१] शंखध्वनिनेंच झाला जागा, उठोनी मग शीघ्र आला ॥ ११ ॥
दोघासवें वासर एकवींस तें युद्ध झालें मग त्या हरीस
संतुष्ट होऊनिच जांबवंतें कन्या दिली सुंदर, बुद्धिमंतें ॥ १२ ॥

## वसंत तिलका.

बाहेर सात दिन वाट बघोनि लोक
ते द्वारकेस मग येति बहूसशोक
मानोनि कृष्ण मृत, तों हरि शीघ्र आला
कन्ये सवें बहुत हर्ष जनास झाला ॥ १३ ॥
सत्राजितास मणि तो दिधला हरीनें
कन्या हरीस दिधली मग सन्मतीनें
मिथ्मापवाद हरिचा मग तो उडाला
माथा बहू उजळतां सकळांत झाला ॥ १४ ॥
दृष्टीस चंद्र पडतां दिनिं याच आला
कृष्णास आळ, ह्मणुनी कथिलें तयाला
देवर्षिनें व्रत गणेशचतुर्थिचें हें,
ते लोक आचरति वाङ्मन आणि देहें ॥ १५
एक्या दिनीं गणपती निजमार्ग चाले
याचें न सावरूनि पोट बहूत हाले

---

१ जांबवान्.

## गणेशचतुर्थी.

मांड्या अखूड, भुज ऱ्हस्व लहान तोंड
त्या नावरे बहुत लांबचि लांब सोंड ॥ १६ ॥
पोटा वरोनि निसटे वसन स्वहातें
तें सावरी घडिघडी उचली पदातें
तों, आंगतें अवजड क्षिति लाच लोटे
तेथें उपायचि नसे बहु दोंद मोटें ॥ १७ ॥
लावण्य गर्व शशिच्या नच माय पोटीं
जो बाळगी सुरवरांत घमंड मोटी
पाहूनिया खदखदा विधु, ध्यान हें, तो
हासे बहू, गणपतीसहि कोप येतो ॥ १८ ॥
हा रूप गर्वित असे करिफार शेकी
शापास्त्र कोपुनि शशीस गणेश फेकी
जे आज पासुनि तुला बघतील, त्यातें
मिथ्या पवाद जडकेल, कळे सुरांतें ॥ १९ ॥
हें वृत्त, ते गुरुमुखें करवूनि चंद्रा
हातें, व्रत, प्रचुर पावविताति भद्रा
देई गणेशहि शशीस वर प्रदान
साऱ्या चतुर्थिंस तुझा करतील मान ॥ २० ॥
जे भाद्रशुक्लचि चतुर्थिस पाहतील
ते एक वर्ष अपवादचि पावतील
माझी पुजा प्रति चतुर्थिस ही करावी
त्यांतील भाद्रसित फाराचि आदरावी ॥ २१ ॥
तेथूनि हासण जगांत विशेष झाला
कृष्णें सभक्ति पुजिलेंच गणेश्वराला
पूजूनि चंद्र हरिणाधिपशाप मुक्त
होवोनिया बहु असे मनिं हर्ष युक्त ॥ २२ ॥

## गणेशचतुर्थी.

### शार्दूल वि०

घालोनी शिबिकेमधें गणपती म्यानांत कोणी करें,
लावोनी पुढती तुरेंहि गजरें आणोनि अत्यादरें
पुष्पें धूप सुगंध, दीप समया लावूनिया अर्पिती
लाडू मोदक खाद्य, या परिं बहू लंबोदरा तर्पिती ॥ २३ ॥
श्रीमन्मंगल मूर्ति शोभति, चतुर्बाहू करीं कंकणें
रत्नाचा मुकुट प्रदीप्त झळके, आंगीं बहू भूषणें
भाळीं चंदन सोंड रम्य वपुला सिंदूर ही लेपिती
हातीं मोदक उंदिरासन अशी मूर्ती जनस्थापिती ॥ २४ ॥

### सवाई.

मंदिर सुंदर त्यांत वरासन वर्तुल रत्नजडीत खरें
चित्रविचित्र सुरेख लखालख लाविति दारिंबहू मखरें
मौक्तिक तोरण शुभ्र वरी छत लोंबति त्यास बहू झुमरें
मंडित, शुंड तयांत गजानन शोभति मोदक घेतिकरें ॥ २५ ॥
गायक गायन गाति पुढें बहु नाचति वार वधू चतुर
मंद्र मृदंग अतंद्रधिमिकूथकवा दक वाजविती मधुर
कीर्तन रंग अभंग सुधारसवर्षाचि, यापरि होय महा
उत्सव, मंत्र घरोघरिं वैदिक पट्टिस बोलति थोर पहा ॥ २६ ॥
दीप लखालख लागति दीपति नेत्र बहू गजनी पडदे
लाल गुलाल हि घालुनि लाविति तेल गलास, बहू हवदे
हस्ति, तुरंगम, सामर, वानर, केसरि, उष्ट्र, ससे, महिषी;
मांडिति सर्वहि चित्रतती, नृप, मंत्रि, वधू, नर, देव, ऋषी ॥ २७ ॥
शुक. बक, सारस, हंस बहू पिक लावक कुक्कुट [illegible]तती
सुरनरकिन्नर खेचर भूचर किंकर शंकर भूतपती

## गणेशचतुर्थी.

नग मृग पन्नग मांडुनि यापरि लोक अरास बहू करिती
गणपति सन्निध पूजुनि त्यासाचि संकट सर्व जगीं हरिती ॥ २८ ॥
मोदक लाडुहि खीरपुरी द्विज जेवुनि पोटभरोनि मिशाला
पीळूनि, जागरणें बहु झोडुनि बोलति तुछचि राज्य कशाला
हें, ह्मणती बहु पट्टिमधें मुखपाठ जटाघन, घाइस येती
इछिति हे करूं मोड परस्पर वीर जसे करिं घेउनि हेती ॥ २९ ॥

## वसंततिलका.

ऐसाचि उत्सव गणेशचतुर्थिचा हा
त्या पेशवाइंत घरोघरिं भाखुवाहा
पूजोनियां जन करीत, कथा पुराणें
श्रीमंत जे घरि घरीं असती पुराणे ॥ ३० ॥
वाड्या मधें बहुगणेश महालरम्य
श्रीमंत विष्णुसम होतजनास नम्य
ही थोर पुण्य नगरी ह्मणवी सुरीती
कीं द्वारकाच हरिची वसती, पुरीती ॥ ३१ ॥

## शार्दूल वि०

वाड्या माजि महान पंडित बहू येती सभेला, जसे
मोठे व्याघ्राचि झुंजती न पडती कोणास कोणी, असे
व्याकर्णी बहु पूर्व पक्ष करिती वेदांत न्यायांतही
साहित्यांत हि पूर्ण ज्योतिषि तसे श्रौतांमधें सर्वही ॥ ३२ ॥
कोणी काढिती पुर्वपक्ष दुसरे सिद्धांत घेती पहा
कोटी कोटिवरी चढे, ह्मणविती विद्वन्मणीते पहा

नं. १७

## गणेशचतुर्थी.

होती वादविवाद एक विषयामध्यें दिनाचे दिन
श्रीमंत प्रभु वाटितात वसनालंकार आणी धन ॥ ३३ ॥
गंधर्वा परि गाति गायक जणों ह्या अप्सरा नाचती
वीणा ताल मृदंग मंजुळ किती सारंगिया वाजती
मोठाले सरदार बैसाते तुरे लावुनि, मोठी जशी
शोभे इंद्र सभाच केवळ, अशा आतां स्मरे स्वप्नशी ॥ ३४ ॥
गीतार्थी हरिभावडी घाडं बहू देती, कथा रंगती
काव्या लंकारग उपायशातेक खादादरें बैसती
होतो ब्राह्मण भोजनों द्विज बहू जेवूनि नानापरी
पक्वान्नें, म्हणतात हो, प्रभु अता आह्मास जन्मावरी ॥ ३५ ॥
जेवोनी भट पोट तट्ट भरुनी कोणी गटारावरी
बैसोनी पिटिती बहूत चिकुका गप्पा निशातोंवरी
काहीं एक नवीने हो पिकाविती कल्पोनिया बातमी
राज्याचो डुळ डूळ एक म्हणतो हें ऐकिलें कींच मी ॥ ३६ ॥
यंत्रा वाजि गटार यंत्र, भट हे त्या मालजकारागिर
तारा यंत्र करूने तुळाचे फुका बाताचि वेडोपेर
झोकोनी सकळा जनां पसरती लाडू खिरी भक्षुनी
आह्मा येत असे हसूं खदखदा त्यांची कृती लक्षुनी ॥ ३७ ॥
रात्रीं घुंगट घेउनीच म्हणती पाहूं नका चंद्र हा
येई आळ वृथाच, शाप दिधला विघ्ना धिपें त्या पहा
तों वाटे मजला आग्रह बहू चोरावरी जाहला
कीं चोरी करनो हे चोर म्हणतोकीं आळ आलामला ॥ ३८ ॥
रानीं सूकर संघ खोडाने मुखें पाहेन चंद्राप्रति
असतो म्हणतो जगांत दिसती, मानीन माझी मती
गजाने उपहास फार शशिनें केला म्हणोनी पहा

## गणेशचतुर्थी.

त्याचें तोंड न पाहती ह्मणुनि यां उर्मी उठेती सहा ॥ ३९ ॥
ऐसा उत्सव हादहा दिन बहू होतांच विघ्नेश्वरा
देती पाठवुनी बहूत गजरें, देई बहूतोवरा
लाडू मोदक खात बैसत असे पाण्या मधें स्वस्थतो
तें सारें सरतांचि येउनि पुन्हा भक्ता घरी बैसतो ॥ ४० ॥

## दसरा.

साऱ्याही दसरा सणांत सण हा मोठा बहू उत्सव
देवीचें नवरात्र होय, दिन हे आनंद देती नव
माळा, सप्त शती, दिवे, घरिं घरीं होती बहू गोंधळ
भक्ता देतअसे प्रतुष्ट जननी होऊनि मोठें फळ ॥ १ ॥
वाजंत्री बहु वाजताति दिवटया घेवूनि येती भुते
आराधी परड्या धरूनि फिरती, आणीक ही मागते
पूजा होय सुवासिनीस, करिती पूजा कुमारीस ही
अंबेचा ह्मणती उदो सकळही आनंदती सर्वही ॥ २ ॥
शेतें घालुनि मंडपी घट बसे अंबा घटाच्यावरी
वाहे रम्य शर दृतूंतिल हवा, विश्रांति तें आदरी
मारोनी महिषासुर, प्रतिपदे पासूनि जी बैसती
भक्ताला जननीच केवळ, सुखें देते अना दीसती ॥ ३ ॥
अंबे तूं सकलेष्ट दायक जगन्माता दयासागर
नशायास समर्थ मृत्यु भय तूं होसी, तरी पामर
अन्याते सुख मागताति, सफळाते आम्र वृक्षाप्रती
टाकोनी जन बाभळीस धरिती अत्यंत कीं दुर्मती ॥ ४ ॥
खाई पापे जनावरी कड कडा अक्राळ विक्राळ त्या
दाढा, क्रूर कृतांत राक्षि शिजना माता जशी रांग त्या
अह्मा होय तुझा बहू भरवसा, आह्मी तुझीं लेकरें
खोड्या ही करितां मुखावरुनि तूं कुर्वाळिशी कीं करें ॥ ५ ॥
ऐसें प्रार्थुनि आरत्या उजळिती देवीस ओवाळिती
माळा बांधिते बोडणेहि भरती देवीव्रता पाळिती
मोठयानें ह्मणती मुखें जय तिचा सत्संतती संपदा
मागोनी जन वंदिती घडिघडी भावेंच तीच्या पदा ॥ ६ ॥
प्रार्थूनी बहु, अष्टमीस पुजिती देवीस अत्यादरें
नारी फुंकिति घागरी घरिं घरीं घेवूनि दोहीं करें

## दसरा.

फूंफूं फूंफूं करितां घुमे घरबहू सानंद ह्या नाचती
भाळीं कुंकुम लावूनी हळद ही लक्ष्मीच ह्या दिसती ॥ ७ ॥
रात्रीं होय कथा पुराण हवनें देवी पुढे जागर
ब्रह्मेंद्रादिक वंदिती पदजिचें माता दयासागर
शिष्टानुग्रह दुष्टनिग्रह करी संतुष्ट भक्तावरी
संसारांबुधि मग्नजे जन तया हस्तें स्वयें उद्धरी ॥ ८ ॥
कोणी घागर फुंकितां ह्मणतसे अंगांत आलीह्या
देवीही संकलेष्ट दायक, मथूराईचिया लेकिच्या
घ्याध्या सर्व पुसोनि, धूप हिजला दावा असे जोंवरी
जोडा हात निजेष्ट मागुनि ह्या देवी असे तोंवरी ॥ ९ ॥
जोडी हात पुढें सरोनिय यमुना बोले ह्मणे पत्रदे
लाखोली करि पिंपळास ह्मणजे होईल देवी वदे
माझें फार कपाळ रोज दुखतें आई कसें मी करूं
कोणी बोलतसे घडी घडि रडे माझें बहू लेकरूं ॥ १० ॥
घाली सुंठकपाळ राहिल तुझें तूं दे मुलाला घुटी
अंगारें बहु देउनी उगेच जी संचारली ती सुटी
देवी संचरतां खरी मग उणें आहे तरीं काय तें
त्रैलोक्यांतिल येतसे घरिं चकीं ऐश्वर्यही आयतें ॥ ११ ॥
घेती सर्व सुवासिनी निजकरीं प्रत्येक ही घागरी
उल्हासें बहु नाचती ह्मणुनियां गीतें गृहा भीतरी
हातें घागर झेलिती कटिवरी घेती मुलें दीसती
शोभा फारचि, एकमेक फुगड्या घेती बहू हासती ॥ १२ ॥
मोठा हा दसरा असे सण उठा अभ्यंग सारे करूं
वस्त्रें नूतन भूषणें हि विविधें आंगीं समग्रें धरूं
ऐसे बोलुनि न्हाति आणि धरिती वस्त्रें नवीं, भूषणें
पक्कानें विविधें करूनि असती अत्यंत संतोषणें ॥ १३ ॥

## दसरा.

कोणी शुभ्र, कितीक लोक हिरवा कोणी बहू पीवळा
कोणी लालचिलाल, अन्य करिती पोषाक हा जांभळा
कंठया आणि मुद्या कडी, धरूनिया तोडे बहू शोभती
भेटायास परस्परें घरिं घरीं जाऊनिया हर्षती ॥ १४ ॥
हत्ती अश्व धुवूनि त्यास करिती शृंगार, माळा गळा
सोन्याच्या बहू घालिती भरजरी झूली धरा आकळा
ऐसे बोलति, धांवती, हिस तिही घोडे सहस्रावधी
दाणा दाण बहू तुफान करितीं, वाटे जणोंनी रधी ॥ १५ ॥
काहीं दुग्ध समान शुभ्र असती हे कज्जल श्यामल
कोणी बोरचि, हे तुरंग तुरकी, कोणी निळे केवळ
सारंगी, जरदे, कुमारत किती हे पंच कल्याण ही
संपत्तीं तिलहीं अमोलिक जणो रत्नेंचि हीं सर्वही ॥ १६ ॥
म्याने, पालखिया, रथादि सकळें हा वाहनें सजिती
भाले, पट्टस, खडग, ढाल तलवारी, हीं हत्यारें किती
शेले, शाले, तसेच मंदिल, बहू वस्त्र तशीं भूषणें
श्रीमंत प्रभू वाटितात‍ि, करिती सर्वां श्रितांतोषणें ॥ १७ ॥
मध्यान्हीं मग भोजनास बसती, पंक्ती सुरम्या अते
वाणावा किति थाट पाट, बदनी शक्तीच कोणानसे
रांगोळ्या समया दिवे चमकती, ताटें रूप्याची किती
धूपाचा बहु घंघमाट, सुकृती जे तेच तें भोगिती ॥ १८ ॥
घ्याघ्या केशरि भात हा म्हणुनियां पात्रा मधें लोटिती
पोटाला फिरवूनि हात भटजी ताटें बहू झोंकिती
शाखा, पापड, लोंणचीं हि विविधें कोशिंबिरी वाढिती
लिंबें सैंधव रायतीं रुचिकरें तोंडी किती लाविती ॥ १९ ॥
घ्याघ्या घीवर उष्ण उष्ण जिलब्यां मांडे खिरी साखर
तृप्ती होय, पदार्थ राहति बहू तैसेच पत्रावर

## दसरा.

मठ्ठा, दुध, दही, सुगंध जलही जेऊनियां उठती
होवोनो बहुतृप्त येउनि सभास्थानांतते बैसती ॥ २० ॥

## भुजंग प्रयातवृत.

विडे घेउनी ते तुरे हार घेती प्रभूला अशिर्वाद सारेच देती
प्रभूच्या कचेरींत पाहूनि नृत्य महाशिष्ट ते त्दृष्ट झाले सभृत्य ॥ २१ ॥
करा स्वारिची शीघ्र आतां तयारी करी अश्व पादात सेनाहि सारी
शमीची पुजा आपटयाची करूंया प्रभू सांगती कार भाऱ्यास जा, या । २२।

## शार्दूल वि०

राजे राव शिलंगणास निघती मोटा समारंभतो
मोठाले उमरावराव निघती रस्ता बहू दाटतो
अंबारींत बसूनिया प्रभु महाराज स्वयें नीघती
मानाचे सरदारही बहुसवें थाटूनिया चालती ॥ २३ ॥

## वसंत तिलका.

केला तयार पटका जरिचीं निशाणें
संगें निजाश्रित बहूत नवे पुराणे
ते बैसतात शिबिकेंत किती रथांत
घोड्यावरी कितिक अन्य हि हाव घ्यांत ॥ २४ ॥

## शार्दूल वि०

तोफा चालति गाडियावर पुढे होती निशाणें किती
घोडेही निघताति, वायुस जवें मागेंच जेटा किती
दांड्या, कान, अयाळ नीट गुडघे पाया मधें तोडर

## दसरा.

माळाही कळगी तुरे जिन मृदू विस्तीर्ण पाठीवर ॥ २५ ॥
घोडेस्वार सहस्त्र एक निघती रांगा धरोनी पहा
हत्ती रंगित शुंड मत्त शतशा डोलोनी जाती अहा
अंबाऱ्या, हवदे, कितीक असती म्याने किती पालख्या
चाले पायदळ प्रचंड, धरुनी रांगा बहू सारख्या ॥ २६ ॥
ढाला पाटिस बांधुनी लखलखा तल्वारि घेती करीं
भालें लांबचि लांब चालति किती घेवूनि खांद्यावरी
बंदूकी धरुनी सुरेहि कटिला बांधुनि, माथा तुरे
लावूनी निघती शिपाई पुढतीं कोणी जयाच्या तुरे ॥ २७ ॥
अंबारींत सवाइ माधव महाराज स्वयें बैसती
कंठी पाच हिरें जडीत बलयें हातीं बहू शोभती
साक्षात विष्णुच मोरचेल चवऱ्या बाजूकडे, छत्रही
नेत्राची बहु पारणाचि ह्मणते पाहूनि सारी मही ॥ २८ ॥
डंका नौबत वाजते धड धडा, शिंगें किती वाजती
भोंबारे डफ वाजती, कडकडा तासे बहूगर्जती
घंटा वाजति हस्तिच्या घणा घणा कोंदाटलें अंबर
स्वारी येउनि ठाकलीच शहराबाहेर गोटावर ॥ २९ ॥
श्रीमंत प्रभु पूजितात अपटा पूजासभारंभ हा
आहे भिक्षुक मंडळी इतरही जे थोर होती महा
देवोनी बहु दाक्षिणा तियुनिया डेऱ्यांत येती, घडी
हर्षाची, बहु बेत बात उठला कोणा नसाधेकडी ॥ ३० ॥
लाखो लोक शिलंगणास निघती बाजार हा दाटला
दोही बाजु तमासगीर धरिती पंथामधे खुंटला
स्वारी तेथुनि मागुती फिरतसे थाटुनिया चालली
त्यांचे सार्थक नेत्र फार असती ज्यांणीं असे पाहिली ॥ ३१ ॥
दारू लाविति शेकडोच जळती ह्या चंद्र ज्योती पहा

## दसरा.

चंद्राचाचि बहू प्रकाश पडला वाटे समस्तास हा
बदूकी बहु काडकाड सुटती होती माशाली किती
स्वारीचा बहू थाट, भाट बिरुदें बांधूनिया वार्णतीं ॥ ३२ ॥

## शिखरिणी.

समारंभे स्वारी त्वरित मग वाड्यांत उतरे
कचेरी सारीही भरभर घडी माजिचभरे
पुढें सोने देती बहुत पुतळ्या व्होन नजरा
पुढें याया कोणा अवसर घडी एक नजरा ॥ ३३ ॥

## शार्दूल वि.

सोन्याचा बहू ढीग येउनि पडे देती समस्ता विडे
देती वस्त्र विभूषणें असति जे विद्वान वाजूकडे
वस्त्रांची लयलूट मंत्रि धरुनी होति लहानावरी
श्रीमंत प्रभु मायबाप असतां चिंतान कोणी करी ॥ ३४ ॥
सीमोल्लंघन जाहलें मग घरीं येऊनि सारेजन
सोने वाटुनि सर्व पावति बहू कैसे मनोरंजन
कर्णी लाजवितातिं देउनि, पहा सोने बहू जाहलें
स्स्ते, लोक पुसे न कोणि हि किती ऐश्वर्य हे पातलें ॥ ३५ ॥
सोने द्या ह्मणतां कितीक ह्मणती झाडास तें लागलें
आहे काय, अशी असे ह्मण वृथा, प्रत्यक्ष कीं जाहलें
कीं झाडासचि हे सुवर्ण निघतें आतां नका काळजी
घेऊं, ध्याच सुवर्ण जाउनि बहू झाडावरूनी अजी ॥ ३६ ॥
सोनें सर्व घरांत आणि पडतें रस्त्यांत दारांत ही
कोणीही तिकडे न पाहत असे झांके तयानें मही

## दसरा.

सोन्याचाचि सुकाळ होय तरिही खर्चास पैसा नसे
सोनू बाई खरी परंतु कथिली बाळाच हातीं असे ॥ ३७ ॥
आहे हा अपटा जरी लघु तरी लोकांत मोठेपणा
पावोनी दसऱ्यास, हा ह्मणवितो सोनेंचि कीं आपणा
शिष्टानीं लघु ही हतांत धरितां, सारेच अत्यादरें
आणोनी विपिनांतुनी हि करिती पूजा तयाची करें ॥ ३८ ॥

## धनत्रयोदशी.

ही आश्विनी कृष्ण धन त्रयोदशी दीपावलीची जाशि होय मायशी
देऊनि दीपावलि ही घरीं घरीं उजेड देतां, करि हर्ष अंतरीं ॥ १ ॥
ही दीप संतान बहूत वाढवी संसार शोभा करि, थाट मांडवी
कूटस्थ दीपावलिची ह्मणावी ही देव ताशीच जनीं गणावी ॥ २ ॥
सुसंतती वीण जगांत सारा अंधार लोकीं ह्मणती पसारा।
तयांत होई जरि दीप एक सुरम्य वस्तू दिसती अनेक ॥ ३ ॥
त्रयोदशी ही किति दीप लावी अहा अशी संतति होत जावी
सुसंतती दीप जगांत रम्य प्रत्यक्ष हे दीप, न यांस साम्य ॥ ४ ॥
त्रयोदशीला यम दीप देती मधेंच ते मृत्युमुखीं न येती
ह्मणोनि यांला विति दक्षिणेला जे दीप, त्याणीं वश मृत्युकेला ॥ ५ ॥
दूतास एक्या दिवसीं यमानें हा प्रश्न केला सकळास, मानें
कोठें दया येत असें तुह्मातें ? किंवान कोठेंहि, वदाअह्मातें ॥ ६ ॥
श्रीमंत, निर्धन, लहान, अणीक मोठे
स्त्री, बाल, वृद्धहि असोत, तुह्मास कोठें
आली कधीं तरि दया, मज सत्य सांगा
किंवा कृपा तुमचि यान शिवेच आंगा ॥ ७ ॥
हत्ती समान दृढ, एक पळांत दांतां
खालीं, सुपारिच जशी रगडूनिखातां
हें क्रूर कर्म तुमचें ह्रदयांत येई
तें कांपवी थरथरा वयु, धैर्य नेई ॥ ८ ॥

## शार्दूल वि.

गर्भाधान, विवाह, मुंज अथवा होऊंचकीं बारसें
गृध्रा तुल्यचि येउनी उचलितां बाळाहि मोटया रसें
माता जरख तिला त्यजोनि तरुणा पुत्रास ही नेतसा
घाला घालितसा, प्रसंगाहि तुह्मा तो सोसवे रेकसा ॥ ९ ॥

## धनत्रयोदशी.

आहे कामाचि आमुचें, मग तुह्मी वार्ता दयेची कसे
आह्माला पुसतां, सुळावरीच या त्याचा कराला जसें
सत्य ब्रह्म, तदन्य तुच्छ ह्मणती वेदांत जे जाणती
पोटार्थी उदरान्य तुच्छचि दया धर्मादि हें नेणती ॥ १० ॥

## दिंवाळी.

अह्मास एकया दिवसीं दयाजी आली, न जन्मांत तशी यमाजी
कांटा उभा राहतसे शरीरा तें आइका स्वामि धरोनि धीरा ॥ ११ ॥

## साक्या.

इंद्र प्रस्थीं हंसाभिध नृप होता प्रियचि जनाला
मृग ये साठीं तो नृप सेना घेउनि जाय वनाला ॥ १२ ॥
अवचित मृगयुग बघुनि तयांतिल मृगीस सोडूनि देई
पळतां मृग तो, धावुनि नृपती पाठ तयाची घेई ॥ १३ ॥
घोडा दवडी भरधांवाचि नृप मग मृग सूंचि पळाला
दृश्या दृश्यहि होउनि उडतो केवळ गगन तळाला ॥ १४ ॥
दिसतां दिसतां एकाएकी गहनीं गडप्प झाला
दुपार होतां मग नृपति श्रम मूर्छित होउनि थकला ॥ १५ ॥
क्षण भरि वटतरूनि बिड छायें खालीं जाउनि बसला
तृषित बहुत तो पाणी पाणी करि, परि पात्रें नजलाला ॥ १६ ॥
श्रमुनि राहिलें सैन्य हिं मागें घोडा थकतां, हातें
त्याचा लगाम घेउनि हळु हळु चालतसे मार्गातें ॥ १७ ॥
जातां जातां एक सरोवरपाहूनि तेथें पाजी
घोडा, आपण पिवुनि जलातें वृक्षा बांधी वाजी ॥ १८ ॥
तेथें कोळि मत्स्य धरिति त्या पुसतो जवळी ग्राम

## धनत्रयोदशी.

आहे कोठें तरि ? मज सांगा करीन मग विश्राम ॥ १९
कोळी ह्मणती येथुनि कोशावरींच आहे ग्राम
तेथिल नृपवर अतिथि भरणपर, हैम तयाचें नांम ॥ २० ॥
तेथे हा जंव गेला तंव बहु पाहुनि तेजाचि, याला
पुर नृप परिजन जाणुनि, देती खाट एक शयनाला ॥ २१ ॥
खाउनिं पीउनि, रात्रीं शयनी नृपती निजतो उठतो
निद्रा कोठुनि पथिकाला, बहु चित्तीं वचका असतो ॥ २२ ॥
ग्रामाधि पतिस पुत्र जाहला होता दिवस सहावा
षष्ठी जाईकीं शिशुतद्भळीं भावी लेख लिहावा ॥ २३ ॥

## द्रुतविलंबित श्लोक.

अति सुरूप करीं धरि लेखनी नृप तिला बघतां ह्मणतो मनीं ॥
युवति कोण सुधां शुमुखी असे उठुनि तो पदरास धरीतसे ॥ २४ ॥
कवण तूं वदहें पारि सूनियां नकारि उत्तरती नृपती सया ॥
पदर ओढुनि आंताचि जातसे नृपति वाटती चीच पहातसे ॥ २५ ॥
त्वरितती परते तंव, तीस तो धरुनिया पदरा प्रति पूसतो ॥
कवण तूं वद सत्यचि, अन्यथा बहुत देइनगे तुजला व्यथा ॥ २६ ॥
सदयता धरुनीच न मारिलें नरवरा असुदान तुला दिले ॥
त्वरित सोडिन सोडिशि तूं जरी तुज पळांतचि मारिन मी तरीं ॥ २७ ॥
नृप कुळीं नर होउनि भीतसे खचित तो नरकांतचि जातसे ॥
मरण तों पदरीं दृढ बांधिलें सतत जीवित अस्थिर नेमिलें ॥ २८ ॥
ह्मणुनि शूर कदापि अहंकृती त्यजिति जेन कधीं, बहुते कृती ॥
जरि समर्थ तुझ्या हनना असे अधाचि हें अवलाबध होतसे ॥ २९ ॥
ह्मणुनिं सोडितसें, वचनास या अइकतां, बदली मग तीतया
असासि धार्मिक तुं तुज सांगते तुजवरी बहुतोषुनि वृत्तते ॥ ३० ॥

## धनत्रयोदशी.

सकळही ह्मणती मज जीवती पुढिल सर्वहि जाणतसे गती ॥
शिशुल लाटिं लिपी अपुल्या करें लिहुनि जात असे गगनीं त्वरें ॥ ३१ ॥

## साक्या.

बोले जीवती विवाह होतां चवथे दिवसीं याला
होउनि अहि चादंश पळांतचि शिशु हा जाइल विलया ॥ ३२ ॥
इतुकें बोलुनि अदृश्य झाली देवी, विस्मित नृपती॥
चित्तीं ह्मणतो अघटित कैशी नकळे ही दैवगती ॥ ३३ ॥
शिशु मरणाला विघ्न करिन मी ऐसा निश्चय केला ॥
नृपतीने, मग प्रात:काळीं अपुल्या नगरा गेला ॥ ३४ ॥
नृप प्रधाना प्रति बोलावुनि तयास करितो आज्ञा
यमुना ऱ्हदांत झडकरी दृढ तर बांधीगे ह प्राज्ञा ॥ ३५ ॥
छिद्र नसावें कोठें त्याला दगडी काम असावें
अन्यास मिळतां जवा, नवातें तिळभरि आंत शिरावें ॥ ३६ ॥
देशो देशीचे गारोडी आणुनि त्यातें कळवा
देउनि साखर तूप शिधेही विप्र जपाला बसवा ॥ ३७ ॥
खाउनि साखर तूप फुकाचें अळस धरूनि ते निजती
त्यांच्या स्थितिला पहावयाला प्रेक्षक बसवा वरती ॥ ३८ ॥
येथुनि बारा कोसावरती हैमाभिधान राजा
सकळ कुटुंबा सहित त्याजला त्वरितचि आणा जाजा ॥ ३९ ॥
त्याला आणुनि यमुना गेहीं ठेवा आणि तयाचा
बाळक पाळुनि ठेवा यत्नें फार नवा नवशाचा ॥ ४० ॥
नृप वचनातें ऐकुनि मंत्रीस सैन्य सेनेशाला
हैमन नृपातिस आणायाला पाठवित नगराला ॥ ४१ ॥
सेना पतिही पुर वेढुनिया हैमन नृपति सवदला

## धनत्रयोदशी.

प्रभुनीं बोलाविलें तुह्माला ह्मणतां, तो बहु भ्याला ॥ ४२ ॥
ग्राम लुटाया सेना आली किंवा धरणें मातें
आलें, ऐसें चिंतीतो, तंव सेवक ह्मणतो त्यातें ॥ ४३ ॥
सोडा सोडा भीति, नृपाज्ञें करुनि चलावें नगरा
कुटुंब, बालक ही घेउनियां शंका दुसरी नधरा ॥ ४४ ॥
हैमन घेउनि नजर, निघाला इंद्र प्रस्थीं आला
राजानें ही यमुना गेहीं स्थापित केलें त्याला ॥ ४५ ॥
खाद्य समग्राहि पेय समग्राहिले ह्यचोष्य शिशु जेजें
मागे, तेंतें पावे सर्वहि निजतो उन्नतसे जें ॥ ४६ ॥
जननी जनकहि परिवारासह, या परि वर्षे सोळा
पाळी भूपति घडि घडि पाहे शिशुतें मासातोळा ॥ ४७ ॥
नवस करुनि बहु जपतप नियमाहि बहुदिन शिशु वाढविला
जपुनि जपुनि बहु निजधन सुत सम अधिक अधिक लाड दिला ॥ ४८ ॥
सुगुण सुलक्षण सुरूप कन्या सुसंजयाची होती
दृष्टि मनोहर कुलीन, जैसें माणिक किंवा मोती ॥ ४९ ॥
योजुनि बालकविवा हतीच्या सहित नृपानें केला
चारी दिवसाहे मूर्तचि जाणो उत्सव उभाचि ठेला ॥ ५० ॥
चतुर्थ दिवसीं वरात होती वाद्यें वाजति भारी
हळदी कुंकू ओंटया भरती लगबग लगबग नारी ॥ ५१ ॥
ढकमक टकमक वधू वरांचें वदन पाहती सकळ
कड कड कड कड वाजति तासे गर्जे कीं घन पटळ ॥ ५२ ॥
खाउनि साखर तूप बहू द्विज शिरा ताणुनी देती
आशीर्वचनें, भवतें असती रक्षक घेउनि हेती ॥ ५३ ॥
इकडे वाद्यें वाजाते इकडे नर्तन करिती नारी
वधू वराचे पक्षी असती हर्षी निमग्न भारी ।५४।
डोळ्या साजी तेलघालुनी वरास पाहे नृपति

## धनत्रयोदशी.

स्वामी, अनति क्रम्यचि आहे दैवाची चित्रगती ॥ ५५ ॥
तितक्या मध्यें कालाज्ञेनें आह्मी तेथें गेलों
बहुत कळवळूं मनीं कृपेनें फारचि परवश केलों ॥ ५६ ॥
तितक्या मध्में सहचर अमुचा अति दुःखानें झाला
भळी परी, नृपनासारंध्रीं आली शिंक नृपाला ॥ ५७ ॥
तोंचि जाहला भुजंग तयानें केलें शिशुचें काहीं
पुढचें तें नचवदवे, आह्मा बोलाया मुख नाहीं ॥ ५८ ॥
जीवित दुर्लभ तर्शांत उत्सव त्यांतचि हानि तयाची
झाली, न घडे स्वामी ऐसें सांगा युक्ती याची ॥ ५९ ॥
मगयम बोले आश्विन कृष्ण त्रयोदशीला देती
निशामुखीं जे दीप तयाला अपमृत्यू नचयेती ॥ ६० ॥
वाटे मजला गुरू किलीही यमें उघड बहु केली
आंधारीं जन पडती झडती दीपें भीतिच नेली ॥ ६१ ॥
खांचखळी बहु दिसेच दीपें ठेचन लागे कवणा
तेणें न घडे अप मृत्यू हें कारण उघडेंचि ह्मणा ॥ ६२ ॥
ज्ञानचि आहे दीप तयानें अज्ञान ध्वांतातें
तरती, नृत्यास मृत्युच कोठुनि अप मृत्यू होत्यातें ॥ ६३ ॥
जेथें सारा उजेड आहे तेथें दीप कशाला
खरतर सहस्त्रकर उगवे तरि व्यर्थचि सर्व मशाला ६४
लावा लावा दीप ह्मणोनी आज्ञा आहे अज्ञा
नित्य प्रकाश रवि समजे त्या नाही आज्ञा प्राज्ञा ६५
स्वज्ञानानें दृष्टीं तुनियां तिमिरचि ज्यांच्या गेलें
अनृत सत्यही निवडुनि ज्यांणीं निर्मल विश्वचि केलें ६६
ते जाणाति कीं कथा असे ही रंजन करण्या साठी
तरि, शिशुवचनें ऐकायाला पंडित लागति पाठी ६७

## नरकचतुर्दशी.

### श्लोक द्रुतविलंबित.

नरक शब्द जिला पहिला असो सुतिथि अश्विन कृष्ण चतुर्दशी
सण म्हणूतचि थोर जगांत हा घरिं घरीं किति उत्सव हा पहा १
प्रहर शेष असे जंव यामिनी उठति पूरुष आणि कामिनी
उजळती बहु दीप चहुकडे लखलखाट उजेड किती पडे २
युवति येउनि मंगल आरती करिति, वेळ सुशोभित फारती
सुत, सुता, जननी, भगिनी, पिता जनक आणि सुनाहि बहूहिता ३
घरभरी बहु रांगाति लेकरें सण दिवाळि तयासचि हें खरें
घमघमाट सुटे किति हा पहा विविध तैल सुंगध किती अहा ॥ ४ ॥
अर गजेहिं परो परिंचे किती युवति येउनियां बहु लाविती
त्वरित याच तुली गणु भावजी मगचिन्हाते विनाय करावजी ५
ह्मणतसे वहिनी अपुल्या दिरा अमृत तुल्य तयास गमेगिरा

### शार्दूल विक्रीडितवृत्त.

नान्या तूं नुठशी मुलें हि उठलीं तूं आळशी हाकिती ६
हां हां, छी, ह्मणवी घरांतिल तुला हीं माणसें हाकिती
न्हा आधीं, समजेल सौख्य हि पुढे निद्रें मधें काय तें ७
माता बोलतसे सुतास, मिळतें कीं खावया आगतें
न्हायाला कितिएक बैसति, किती आंगास ही लाविती ८
व्याही जांवई आणि इष्ट सुहृदां न्हायास बोलाविती
वाजत्री बहु वाजताति सुटती दारू फटाके नळे ९
प्राया ह्या समयीं नको णिाहि अनुत्साही असा आढळे
जावाई रुसला विलंब करुनी न्हायास आला, ह्मणे १०
पाचाचे बहु तेल काढुनि मला लाया तया ह्मणे

## नरकचतुर्दशी.

थट्टेने ह्मणती, दहाहि दुसरे रहोत एकीकडे
आधीं रुष्ट ह्मणोनि तेल तुमचें काढीत सोंरोकडें ॥ ११ ॥
लावी अतर चंदनी ह्मणतसे कांत स्वकांते प्रती
येथें ती तुमची नसे प्रियसखी तन्नामकांस प्रती
लावी स्नेह ह्मणोनि स्त्री ह्मणतसें, तूं रुष्ट आहेस कां ?
अंगा लावियला ठरेन पळही तो स्नेह मानूं नका ॥ १२ ॥

९

## लक्ष्मीपूजन.

लक्ष्मी पूजन होतसे घरि घरीं साऱ्या दुकानांत ही
मोती माणिक पांच आणिक हिरे सोनें रुपें सर्वही
मांडोनी धन पूजिती घरि घरीं जाताति बोलावया
आनंदे इतरे तरास ह्मणती यावें विडा घ्यावया ॥ १ ॥
मोठा हा अरसे महाल झुमरें त्या माजि हीं लोंबती
आधीं एकचि दीप त्यांत बसतो, माघोनि हे सोबती
रते जेचि तया समान असती, जातींत कोणी तरी
होतो दीपक तो स्वतुल्य करितो स्वज्ञातितें लोकरी ॥ २ ॥

## वंशस्थवृत्त.

घरोंघरीं लोकचि लोक लोटती घडो
घडी बारचि बार सूटती
स्थळो स्थळीं मीजचि मौजदीसती
हटो हटी अश्वचि अश्व ही असती ॥ ३ ॥
बग्यां किती धांवति अश्व हे किती
मधें फटाके किति लोक फेंकिती
तशांत ही लोक मजा पहावया
जमुन येताति बहू फिरावया ॥ ४ ॥
खणा खणाचे अरसे खणोखणी
गलास हंडया किति कोणत्यागणी
मधें मधें हीं झुमरें अहा अहा
जणों सुरस्थानचि हें पहा पहा ॥ ५ ॥
छतें वरी शुभ्र, अधःक्षितीवरी
बिछायती शुभ्रचि दुग्ध ज्यापरी
गृहांस सर्वांहि चुना दिला ह्या
सफेत ह्या वाटिति शालिला ह्या ॥ ६ ॥

## लक्ष्मीपूजन.

### मालिनीवृत्त.

कडकड तासे वाजती क्रूर भारी
फडफडाची फटाके सुटती सात वारी
चटचटचट मोठया लागती फूल बाज्या
धुमधुमधुम धंधक होतसे फार बाज्या ॥ ७ ॥
सर सर सर सूंसूं हे नळे सूटताति
फट फट फट काहीं लागतां फूटताति
सुम सुम सुम शद्बे सूटती चंद्र जोतीं
धवल तर रुचीनें पूर्णिमा काय होती ॥ ८ ॥
घरि घरिं गवयांचीं गायनें होत, माना
तनननननन घेती रम्य आलाप नाना
सरिगम पधनीसा सानिधा पामगारी
चढवुनि उतरोनी गाति आल्हाद कारी ॥ ९ ॥
ठमक ठमक नृत्ये होति वारां गनांची
झुमझुमझुम सारीं घुगुरे तत्पदांची
मधुर मधुर ताला तुल्य मंजुध्वनीतें
कारीति, बहु सुखातें नृत्य देई मनीतें ॥ १० ॥

## बलिप्रतीपदा.

अबळ नृपति जेथें लोक तेथें उनाड
न धरिति कवणाचा कोणि ही एकपाड
ह्मणुनिच बळिचें हें राज्य राहो सर्वदा ही
स सुखचि जन सारे दुःख कोणी न पाही ॥ १ ॥
समयिं समयिं सारी स्नान पाना दिकामें
करिति, नसति येथें लोक कोणी रिकामे
अशन वसन भूषा पावती स्वेष्ट, लोक
सकलहि बळि राज्या माजि होती विशोक ॥ २ ॥
त्रिपदामित धराही याचि लीवा मनानें
बलि निकटिं, तयानें दीधली त्यास, मानें
मग हरि वदला तो तुष्ट होऊनि, त्यातें
त्वरित वलि नृपा तूं माग आतां वरातें ॥ ३ ॥
क्षितिवरि दिनतीन्ही राज्य माझें असावें
मग हरि वदलाकीं राज्य तुझ्याचि नांवें
ह्मणतिल दिन तीन्ही, या मुळें ह्या जगांत
वदति वळि नृपाचे राज्य तीन्हीं दिनांत ॥ ४ ॥
सततचि मज वाटे राज्य व्हावें बळीचें
कधिं हि भय नसावें या प्रजेला कलीचें
अबळ नृपति योगें दुःख कोणा नसावें
सततहि बळि राज्यें सौख्य सर्वा असावें ॥ ५ ॥

## इंद्रवज्रा.

उजेड सारा बळि राज्य आहे
तयान आंधार रतीन साहे
मिटोनि डोळे हि खुशाल चाला
कधीं न ठेचा बसती तुह्माला ॥ ६ ॥

## बलिप्रतीपदा.

### वसंततिलका.

शुक्ल तिथी प्रतिपदा सण कार्तिकांत
ख्याता बलि प्रतिपदा ह्मणुनी जगांत ॥
हा थोर होय सण, या दिवशीं करारे
आनंद, पाहुनि तुह्मा विपदा थरारे ॥ ७ ॥
न्हाती समस्त नव भूषण वस्त्र घेती
वस्त्रें यथा विभव विप्रजनास देती ॥
गीता दिकें करिति रंजन पुण्यवंत
जेते सदाहि असती धन धान्यवंत ॥ ८ ॥
खेळूं चला मिळुनि सर्वहि सोंकटयाते
येणेंचि लोक बहु पावति संपदातें ॥
ज्ञाते हि बोलति सुखप्रद आजि खेळ
खेळुनि न्या अजि समग्र सुखांत वेळ ॥ ९ ॥
गौरी सशंकर ह्मणे उघडी कपाट
क्रीडा गृहीं बसुनि आपण सारिपाट ॥
खेळूं सखे, अजि असे सण हा दिवाळी
अभ्यु दयार्थ मुनिवाक्य अवश्य पाळी ॥ १० ॥
मी द्युत हे रचियले कवणास काल
क्षेपार्थ, तन्वि कवणास धनार्थ, माल ॥
नासावयास, नच केवळ दुष्ट पाहे
तूं द्युत, खेळ, गुणयांत बहूत आहे ॥ ११ ॥
मांडोनिया पट, उमाशिव खेळताती
जिंकावयास इतरे तर पाहताती ॥
हूं, टाकडाव, ह्मणतो गिरिजे ससांब
मी लाविती पण, सखे क्षणमात्र थांब ॥ १२ ॥

## बलिप्रतिपदा.

बोलोनिया भुवन एक सदाशिवानें
जें लाविलें हिरुनि तत्क्षण तें शिवाने ॥
तेंव्हां द्वितीय भुवना प्रति सांब लावी
अंबाहरूनि बहु कौतुक तें हि दावी ॥ १३ ॥
ठेवी पणास तिसरें चवथें उमेश
तो कावला शिव मनांत ह्मणे विदेश ॥
घ्यावा तरी, सकळ लाजवितील मातें
कीं, बायकोस हरला, नच लाज यातें ॥ १४ ॥
बोले उमाझड करी, अजि डाव टाका
वरा ह्मणोनि अरडोनि बहूत वांका
तत्रापि दान न पडेचि तुह्मास काहीं
दानाविणें जय जगीं कवणास नाहीं ॥ १५ ॥
ऐकोनि शंकर सरोष वदे सतीस
टाकोनि फारमज बोलशिवीसतीस ॥
एका प्रती जयपरा जय सर्वदाही
नाहीत गर्व नकरी, क्षण वाट पाही ॥ १६ ॥
चौताळुनी त्यजितसे शिव, दोन फासे
बेती पडे, खदखदा तंव फार हासे ॥
भार्या, चिडोनि शिव पंचम षष्ट सात
लावी, हरीच भुवनें गिरिजा क्षणांत ॥ १७ ॥
मोटे खिलाडु ह्मणताति तुह्मास देवा
संसार खेळ तुमचाचि विचित्र, ठेवा
डावावरील पण, ऐकुनि शंकरानें
केला पुढें बइल आपुलिया करानें ॥ १८ ॥
तो हारितांची, गजचर्म, पुन्हाहि सर्प
लावी शशांकड दरू, गीरिजा सदर्प ॥

## बलि प्रतिपाद.

सारेंचि जिंकुनि ह्मणे, न चडाव साधे,
शक्तिविणे उचलिता गुरु कार्य, बाधे ॥ १९ ॥
कौपीन घालुनि धरुनीहि वल्कलांते
रागें भरूनि, उधव्‌नि पटास लांतें ॥
गंगा तटास शिवजाय रुसोनि, राहे
चिंता ज्वरास ल्हदयांत बहूत वाहे ॥ ३० ॥
आणावयास गुहशंभु कुमार गेला
मार्गात भेटुनि ह्मणे, बहु रुष्ट तेला ॥
कां पावला, विनत मी चरणास देवा
सांगा मला, करिन होईल तीच सेवा ॥ २१ ॥
हुंगोनि सांब, सुत मस्तक, वृत्त सांगे
त्वन्मातृ निर्जित ह्मणोनि वनांत रागें ॥
मी चाललों, अइकतां ह्मणतो कुमार
पाठीस मीहि तुमच्याचि असे तयार ॥ २२ ॥
द्युतांत जिंकुनि तुझी मजलागिं माता
माझ्या घरांतुनि निघ क्षाणि या, वनांता ॥
आतूं ह्मणोनि वदली, मज वाट, रातों
रात्री फुटेल जिकडे, तिकडेच जातों ॥ २३ ॥
तो द्युत मार्ग मजला शिकवा शिवाहो
चिंता मनांत तुमच्या तिळही न राहो
आणीन जिंकुनि समग्रधन क्षणांत
सुस्वस्थ चित्त चिरहा अपुल्या गृहांत ॥ २४ ॥
द्युतीं सुशिक्षित कुमार शिवें, मृहाला
येऊनि शीघ्र, जननीस असें ह्मणाला ॥
कीं, तात कांनस दनीं, वृष चंद्र कांहे?

नं. ता.

## बलि प्रतिपदा.

येथेंच, सत्यव्रद, आण असे तुला हे ॥ २५ ॥
द्युत स्त्रयेंचि करुनि स्वय मेव झाला
स्वत्तात सत्वर पराजित, तो वनाला ॥
गेला स्वयेंचि, मजला ह्मणतोस काय
येईल आपण चिमी न धरीन पाय ॥ २६ ॥

## भुजंग प्रयात.

ह्मणे स्कंद माझ्या सवें खेळ माते
कसें द्युत तें दावि खेळून मातें ॥
असें ऐकतां पार्वती एक भागीं
वसे स्कंदही बैसला एक आंगीं ॥ २७ ॥
कुमारें पणाला पुढें मोर केला
उमेनेंहि नंदी पणाला वियला ॥
गुहें टाकितां डाव, नंदी हिरोनी
त्वरें घेतिला, चातुरीतें करोनी ॥ २८ ॥
वृषानें शशी, शक्तिनें घेइ साप
मनीं पार्वती पावली फार ताप ॥
स्वकौपीन ठावोनियां हस्तिचर्म
हरी, सर्व जिंकोनि बोले सवर्म ॥ २९ ॥
असे बापभोळा तयालागि आई
जरी जिंकिलें तूं तरी त्यांत काई ॥
घरांतुनि तातास तूं घालवूनी
दिलें, भोधि आतां फळातें लवूनी ॥ ३० ॥
असें बोलूनी येउनी शीघ्र, ताता
ह्मणे, खेळुनी जिंकिली कीं स्वमाता ॥

## बलिप्रतीपदा.

त्वरें इकडे पार्वती सन्निधीला
गणाधीश येवोनि बोले सतीला ॥ ३१ ॥
मुखीं म्लानता कां मला सांग मातें
करीन त्वरें आधिच्या मीशमातें ॥
ह्मणे पार्वती जिंकिला मी ह्मणोनी
महादेव गेला गृहातें त्यजोनी ॥ ३२ ॥
वृषार्थ केव्हां तरी तो गृहाला
महादेव येईल, असें मनाला ॥
दिलें धैर्य, सारोंहि जिंकोनि ताता
तुझ्या सोदरें दीधलें, एक दता ॥ ३३ ॥
घरीं देव येईल कैसी, मनाला
अशी काळजी, तोंड दावूं जनाला ॥
कसें, मी, मला बोलती लोक कल्या
मुलासाधि ह्यातूंचि निर्विघ्न कल्या ॥ ३४ ॥
वयेशी कवी द्युत मी सोदराला
जितोनी घरीं आणितोगे हराला ॥
असोनि तुझा पुत्र मी काळजीतें
फुका वाहशी सोडि सोडीच भीतें ॥ ३५ ॥
शिक द्यूत तो, दोन घेऊनि फासे
निघ, देव होता तिथें पातलासे ॥
ह्मणे सोदराला पित्याच्या समक्ष
सवें माझिया खेळ घेघेच अक्ष ॥ ३६ ॥
मग क्रीडतां बंधु दोघे समोर
पणा लावुनी मूषका तेंवि, मोर
हिरोनी वृषानें हि जिंकी गणेश
मनीं खिन्न झाला बहूतो महेश ॥ ३७ ॥

## बलिप्रतिपदा.

हिरोनी पुन्हा माल सारा शिवाचा
गुहाचाहि घेऊनि आला गणाचा ॥
पती, वृत्त अंबेस सांगोनि सर्व
ह्मणे जिंकिलें मी गुहाला सशर्व ॥ ३८ ॥
गणेशास शाबास शाबास बोले,
बहू तोषुनी अंबिका फार डोले ॥
महत्कार्य केलें खरें तूं गणेशा
परी प्रार्थुनी मागिलें कां ! महेशा ॥ ३९ ॥
करी सामदानादि, आणी शिवाला
असें बोलतां अंबिका, तो निघाला ॥
ह्मणे सेवकां, सर्व सामान घाला
करोनी तयारी अणा मूषकाला ॥ ४० ॥
बहू र्‍हस्व बांधा असे पोट मोटें
धरी आवरोनी वरी सोंड होटें ॥
कटीचें सुटे वस्त्रही पायघोळ
लघू हस्त मांड्या बहू होय घोळ ॥ ४१ ॥
बसोनी पिटी मूषकातें त्वरेनें
उडया मारितो टंटणा तो कडेनें ॥
किती अश्व खंदा; तरी शासनातें
धरी, ओळखूनी गणेशा मनातें ॥ ४२
त्वरेनें गणाधीश येतोंचि गेला
हसोनी भवानीश तो बद्रिकेला ॥
असा नारदें ज्ञात वृत्तांत केला
महा विष्णुला तोहि तेथेंचि गेला ॥ ४३ ॥
ह्मणे खेळ खेळा तिफाशीच सांबा
पहा वश्य होईल तेव्हांचि अंबा

## बलिप्रतीपदा.

पहातीन फाशांत मी एक फासा
छळें होउनी दावितो हा तमासा ॥ ४४ ॥
ह्मणे नारद स्थाणुला, धैर्य ठेवा
महत्कार्य झालें पहा देव देवा ॥
भव वृत्त जाणावयाचेंचि काज
मनीं चिंतुनी येतसे विघ्नराज ॥ ४५ ॥
अरे रावणा शीघ्र तूं होय ओतू
पुढें उंदिराच्या अकस्मात होतूं ॥
बहू भीति दे घालवी उंदिराला
क्षणें पाय काढील तो मंदिराला ॥ ४६ ॥
दशास्य त्वरें होय मार्जार त्याला
पहातांचि, उंदिर गेला बिळाला ॥
गणेशस्वयें पादचारीच झाले
शिवा सन्निधी मंद चालोनि आले ॥ ४७ ॥
वदे पाद वंदूनि विघ्नेश सांबा
चलाहो घराला, न येतांचि, अंबा ॥
पहा प्राण टाकील, याहो, चलाहो,
मदंबा तुह्मा पाहुनी हर्षला हो ॥ ४८ ॥
महा देव बोले सतीती तिफासी
जरी खेळ खेळे, तरी मी गृहासी ॥
त्वरें येईन, श्रेय मातेस कांहीं
गणाधीश बोले तुह्माविण नाहीं ॥ ४९ ॥
असें वाक्य ऐकूनिया नारदांतें
सवें रावणा आणि साऱ्या गणातें ॥
निघेवेउनी सांब कैलास शृंगीं
क्षणें पातळे बैसले देव संगीं ॥ ५० ॥

## बलि प्रतिपदा.

बघोनी उमेला महा देव हासे
म्हणे आणिले योजुनी तीन फासे ॥
जरी अक्ष घेउनि हे जिंकशील
मलागे, तरी होस तूं सत्यशील ॥ ५१ ॥
म्हणोनी बरें, अंबिका बोलताहे
वृषादी तुझें द्रव्य मीलाविताहे ॥
तुह्मी लाविता काय सांगा पणाला
करी ऐकुनी सांब खालीं मुखाला ॥ ५२ ॥
दया पोटिं येऊनि त्या नारदानें
स्वकौपीन बक्षीस केलेंच त्यानें ॥
महोदार वीणो पवीत प्रदान
करी तत्क्षणी धीर सर्व स्वदान ॥ ५३ ॥
करी शंभु संतुष्ट होऊनि खेळ
उमेशीं, सभोंतीं सुरांचाहि मेळ ॥
बसे, चालतांडाव रंगांत आला
शिवाच्या मनीं हर्ष अत्यंत झाला ॥ ५४ ॥
जें मागते दान उमा पडेना
तें, त्रासली, खेळचि आवडेना ॥
होऊं नदे शंभु टिकावतीचा
उत्साह भंगे बहु पार्वतीचा ॥ ५५ ॥
जें दान मागे शिव तेंचि येई
विष्णूच फासा, मग कांन देई ॥
जें जें पणा लावितसे उमातें
हिरोनि घेत तत्क्षण शंभु त्यातें ॥ ५६ ॥
कानीं न बाळी बुगडी न चोळी
नाकांतिली घे नथ चंद्र मौळी ॥

## बलिप्रतिपदा.

लोकांत लंकेचिच पार्वतीती
ह्मणावया योग्याचि होय रीती ॥ ५७ ॥
गजास्य गर्वे वदला सभेंत
न खेळ माते, सकळींहि बेत ॥
लुटावयाला तुज, विष्णु फासा
झाला, कराया तुझिया प्रहासा ॥ ५८ ॥
असें सुताचें वच ऐकुनी ती
सरोष बोले, करितां कुनीती ॥
तुह्मास शापीन, कसे असारे
अहो सुरानो कपटीच सारे ॥ ५९ ॥
भागीरथी भार धरोनि शूल
शिरीं शिवा होइल तूज भूल ॥
तूं पावशी भांग विवूनि, कर्म
भोगी पुन्हा तूं नकरीं अधर्म ॥ ६० ॥
जिथें तिथें तूं करिशी कुचेष्टा
तूं नारदा पावशिरे अपेष्टा ॥
स्वप्नांत ही स्त्री सुख तूज नाहीं
होणार तैसें गृह सौख्य कांहीं ॥ ६१ ॥
तू वंचिलेंरे अबले समातें
विष्णो तयाचें फळघेच हातें
नेईल हा रावण शत्रु भार्या
तुझी बहू कष्टशि तूं अनार्या ॥ ६२ ॥
येऊनि पोटीं मजशी कुमारा
तूं बाल चापल्याचि दुर्निवारा
केलें, न तूं वृद्ध युवाहि होशी
कुमारतेनेंच वपूस पोशी ॥ ६३ ॥

## बलि प्रतिपदा.

विघ्नेश बोले मजलागि धोका
ज्याणें दिला होउनि पुष्ट बोका
देईच माते अधमास शाप
भोगो स्वयें जें कृत होय पाप ॥ ६४ ॥
बोले उमा, रे अधमा तु वाजें
मद्बाळ काला कृत विघ्नमाजें
दुष्टा तयाचें फळ भोगि आतां
शत्रू तुझ्या विष्णु करील घाता ॥ ६५ ॥
शापोक्तिने देव बहू सरोष
माना ह्मणे नारद फार तोष
ही भूजरी उर्ध्व करील माता
तेव्हां त्रिलोकांत तुह्मान त्राता ॥ ६६ ॥
पिऊनि हालाहल तप्त झाला
गंगा शिरीं इष्टाचि त्या शिवाला
नेईल हा रावण विष्णु कांत
करील ती शीघ्रचि राक्षसांता ॥ ६७ ॥
स्कंदास कौमार्य दिलें बरेंच
कामार्त होऊनि न खाय ठेंच
मला न जागान सुख स्त्रियाचें
तेंही बरें, राज्य महासुखाचें ॥ ६८ ॥
मुनी मनीं हर्षित होत आहे
टटण उड्या मारुनि नाचता हे
ह्मणे बरी गंमत जाहलीही
हासे करोनी हहहाहि हीही ॥ ६९ ॥
पाहोनि चेष्टा मुनिची सुराला
झाला बहू हर्ष, ह्मणे तयाला

## बलिप्रतिपदा.

देवी, कळीवीण म चैन तूतें
देवींष तूं नाचविशील भूतें ॥ ७० ॥
तूं माग आतां वरदान मातें
बोले मुनी क्रोध नतूं सुरातें
करीं, सुरानो, वर ध्या ह्मणेती
समस्त ते जोडुनि हस्त येती ॥ ७१ ॥
सुरास वे शंकर अंबिकेला
प्रार्थूनि बोल अपराध केला
घालुनि पोटीं करुणा करावी
तुंवा मुळें सर्वाहि रक्षिजावी ॥ ७२ ॥
बोले उमा खिन्न शिवा नसाहो
कालत्रयीं भिन्न पणा नराहो
माझ्या तुह्मार्शी न कराचि लोप
प्रीतीस, चितीं न धराचि कोप ॥ ७३ ॥
सयें बलि प्रतिपदेस तुह्मास वें मी
हें द्यूत खेळाने असे विजयीच, हे मीं
होतील पूर्ण, जन जे करितील खेळ
ते पुत्र पौत्र युत होतिल सर्व वेळ ॥ ७४ ॥
सर्वास सर्व वरदायक आदि शक्ती
कल्प द्रुमा घरि फळे कारितांचि भक्ती
तद्वाक्य जे धरिति त्या प्रतितीच पाळी
द्यूतें अजी सतत होउ तुह्मा दिवाळी ॥ ७५ ॥
खेळुनिया उठति सर्वाहि सारिपाट
या मांडले असति मध्य गृहांत पाट
जेऊन सत्वर वरी मग गायनाला
येऊं विलंबन करात्त उशीर झाला ॥ ७६ ॥

## बलिप्रतिपदा.

केळीचें पान मोटें, धग धगित दिवे लाविले, घातिल्याही
रांगोळ्या, धूप नाना घमघम करिती, जावयी आणि व्याही
येती, रंगीत पीतांबर भरजरिचे नेसुनी बैसताती
जागी जागीं रुप्याच्या उजळति समया, वाढवी वाढिताती ॥ ७७ ॥
हास्यानें जांवयांतें ह्मणति मिळुनिया मेहुणे, घ्याच लाडू
लावा लावा झपाटा, वरि वरि करितां सोंग आंतूनि नाडू
थाळी पीठें भरोनीच मच मित, दही झोंकिलें ये कशेर
संध्याकाळीं भुकीनें मग बहुत तुह्मी लागुनी व्हाल जेर ॥ ७८ ॥
जावाई मेहुण्यातें हसुनि बहु वदेकीं, बसा भोजनाला
प्रातःकाळींच पोहे रगडुनि निठवे भुकचि तुह्माला
हस्तीचें पित्त जाया अदमण वजनी सुंठ लागे, तयासी
तोळ्या माशांस शांती घडिभरिहि तरी काय होव्हावयाची ॥ ७९ ॥
व्याही व्या ह्मास बोले प्रथम सण नवा भोजन स्वस्थ व्हावें
आहे हे आपुलेंची घर, अधिक उणें पूर्ण मानूनि घ्यावें
कन्येचा पक्ष आह्मी ह्मणति बहु उणा त्यांत संबंध मोटा
थोरा राशींत चाले, सकटाचि मिळतांकीं रुपायाहि खोटा ॥ ८० ॥
लाडू खाज्या करंज्या घिवर गुळवऱ्या तारफेण्या चिरोटे
बासुंदी आणि मांडे मृदुमृदु जिलिब्या वाडगे मोट मोटे
श्रीखंडाचे भरोनी, उन्हुन उन्हुन ह्या घ्या पुऱ्या, घ्याच लाडू
व्याह्यानो जांवयानो, ह्मणति बहु सखे सोयरे आणि साडू ॥ ८१ ॥
पंक्तीचा थाट मोटा बहुताचि उठला सर्वही बेत बास
वर्णावें काय तेथें सकळहि असती दक्ष ज्या योजनांत
घेती सारे विडे ते, उठुनि मग सभे माजिं येऊनि नाचा
बैसोनी, उत्सहवानें अनुभविति असा भोग मोटया साणचा ॥ ८२ ॥
राजाहूनि गर्वे विशेष मजला सत्ता प्रजांची, अहा

## बलिप्रतीपदा.

शेणाचाचि बळी करोनि करिती पूजा तयाची पहा
पाताळीं हरिने प्रतिष्ठित बळी तो एक, झाले किती
लोकानीं करितां घरोघरिं, नसे शक्तीस यांच्यामिती ॥ ८३ ॥
सारें विष्णुमय प्रसिद्ध ह्मणतें जें शास्त्र, त्याला प्रमा
आहे हें अनुमान पोषक, पहा लोकांचिया विक्रमा
विष्णूनेंच बळी प्रतिष्ठित, असें कां बोलतां ? स्वांगणीं
लोकीं स्थापित हे किती घरि घरीं, यातें न कोणी गणी ॥ ८४ ॥
विष्णूनें बटुरूप घेउनि बली सर्व स्वतो नाडिला
बांधोनी बहुदीन हीन करुनी पाताळिंही घातिला
त्याणें सत्य न सोडिलें, ह्मणुनि तत्पूजा जगीं होतसे
आपत्तींतहि सत्य सोडिति नजे, त्यां मान ऐसा असे ॥ ८५ ॥
गाई वत्स शता वधी मिळवुनीं एकत्र जातीवना
वाद्यें वाजविताति गोप ह्मणती गाणीहि गोपांगना
शृंगे रंगविती विचित्र वसने घालूनि पाठीवरी
वोवाळूनि तयांस, हर्ष करिती क्रीडाहि नानापरी ॥ ८६ ॥
दो पैशांतचि देति राज्य बळिचें, ओवाळिती आरती
येऊंद्या बळिराज्य, सर्वांहि इडा पीडा टळो बोलती
दासीद्या ह्मणती भल्यास लुगडी चोळ्याहि ओवाळणी
मागा या करितां बहूत तुमच्या दाटी असो प्रांगणीं ॥ ८७ ॥

---

७ १ कोंतेला.

## गोवर्धनोत्सव.

गोवर्धनोत्सवहि आजचि होत आहे
आनंद त्यास करिताति तयास लाहे
कृष्णें प्रसिद्धि जगतांत बहू तयाची
केली समग्राहे कथा अइका तयाची ॥ १ ॥
गोपा सर्वे सकळ घेउनि कृष्ण गाई
चारावया प्रतिपदेसचि आजि जाई
गोपीसवें बहुत गोप तिथेंच येती
संगें चतुर्विधहि अन्न बहूत घेती ॥ २ ॥
ते अन्न पर्वत करूनि बहू पताका
लावूनि, वाद्य गजरें भरिताति नाका
गोपांगना चपल नेत्र विलोल पाणी
अत्यंत सुस्वर पिकस्वर गाति गाणी ॥ ३ ॥
गोपाळ धांवति पुढें किति नाचताती
कोणी स्तुती करिति कोणिहि गान गाती
श्रीकृष्ण त्यांस ह्मणतो करितां कशाचा
हा उत्सव प्रकत, देवहि कोण याचा ॥ ४ ॥
जेदेव खाति न पितीच तयास देणें
होईल काय फळ लब्ध पहाचि येणें
पक्वान्न लुब्धचि मनांत तुह्मी ह्मणोनी
वाटे महोत्सव तुह्मिं करितां बरोनी ॥ ५ ॥
प्रत्यक्ष खाति नतया प्रति देइ कोणी
जो खाइना दगड, त्यादधि दुग्ध लोणी
देतां ह्मणोनिच तुह्मा विधिनें गुराखी
केलें पहा विधि कसें कुशल त्वराखी ॥ ६ ॥

---

१ स्वर्गास.

## गोवर्धनोत्सव.

कृष्णा असे नवद तूं ह्मणताति गोप
वर्षास उत्सव करून करूंच लोप
हा इंद्र तोषद असे करिताति सारे
याचा अनादर सख्या करिशी कसारे ॥ ७ ॥
गोवर्धन स्वकुळ देवचि होय आह्मा
तो इंद्र काय अमुच्या उपयुक्त कामा
पूजूनियास मथुरास्थ व्रजस्थ लोक
होती सदा बहु सुखी अणखी विशोक ॥ ८ ॥
पाणी आणीक तृण देउनि पाळितो हा
गाई ह्मशी बहुत पुष्ट करी सुदोहा
याच्या समीप कृषिनें भरितोंहि पोटें
प्रत्यक्ष दैवतचि हे पर होय खोटें ॥ ९ ॥
याला पुजूं सकळ आपण, आयकोनी
कानास कान बहु लाविति, आदरोनी
कृष्णोक्त होय हित फारचि आदराहो
गोपाळ बेत अमुचा ह्मणताति राहो ॥ १० ॥
भक्षोळ पर्वतचि अन्न तरीच मान्य
आह्मा, तदुत्सव करी अस, तूंचि धन्य
ऐकूनि कृष्ण करितो मग निश्चयातें
गोपाळ सर्व असताति सहाय त्यातें ॥ ११ ॥
गोपा क्षिती वरि बहू पसरोनि वस्त्रें
सर्वान्न कूठ करिती गिरि तुल्य मंत्रें
श्रीकृष्ण त्यास ह्मणतो नयनें मिटाहो
सर्वान्न भक्षुनि गिरि बहुतुष्टिलाहो ॥ १२ ॥
गोपाळ नेत्र मिटिती तंव तोस कृष्ण
गोवर्धना चळ गुहेंत शिरोनि कृष्ण

## गोवर्धनोत्सव.

माया तनू ह्मणतसे बहु तुष्ट आतां
झालों तुह्मास मधुरान्न यथेष्ट खातां ॥ १३ ॥
बाहेरही असुनिया सकळा मधें तो
श्रीकृष्ण बोलत असे, सकळास देतो
भक्षुनि अन्न अमुचें सकलेष्ट याची
पाहूनि व्या प्रचिति दैवत होय हाचि ॥ १४ ॥
पाहूनि विस्मित समस्तहि कृष्ण कृत्य
कृष्णास गोप ह्मणताति समस्त भृत्य
आह्मी तुझें शिकविशील तसेंच वागूं
उत्साह हा करुनिया सकळास सांगूं ॥ १५ ॥
इंद्रोत्सवाहुनि उत्सव फार केला
पाहोनि नारद कलि प्रियशीघ्र गेला
इंद्रा कडे, करुनि पूजन इंद्र त्यास
बोले ह्मणे कुशलकीं सदगा तुह्मास ॥ १६ ॥
इंद्रे बहूत वरचेवर पृष्ट केला
बैसे अधोमुख मुनी धरि खिन्नतेला
बोला मुनें त्वरित शल्य मनात काय
कांही मुखें करितसा बहु हाय हाय ॥ १७ ॥
गुराख्यानी केला दगडचि पहा थोर मघवा
कशाला तूं इंद्रा स्वपदि बसशी ? गर्व अघवा
अजी तो घेईल त्वरितचि ह विर्भाग सकळ
हरीं इंद्राणीही मग धरिशि सन्यासाचें वळ ॥ १८ ॥
हिता साठी तुझ्या तर फडूनि मी सांगत असे
मुनीजे आह्मी त्या तिळभरि उणें कांहिच नसे
तपें वीर्यें शास्त्रे प्रबळ बहु जो होइल तया
ह्मणू आह्मी देवेश्वर अनुसरोनीच समया ॥ १९ ॥

## गोवर्धनोत्सव.

### वसंत तिलका.

गेला मुनी वदुनिया परि, तद्वचातें
ऐकूनि तो कुपित इंद्र, व दे घनातें
कल्पांत वर्षुनि करा बहु गोकुलाला
लोकांस त्यांतिल बहूतचि गर्व झाला ॥ २० ॥
घो घो प्रचंड सुटला घन घोर वारा
शुंडा समान बहु कोसळताति धारा
विद्युल्लता लखलखा लवती कडाडा
निर्घात होति घन गर्जति ही गडाडा ॥ २१ ॥
कल्पांत तुल्यचि दिसे बहु तो प्रसंग
भ्याले समस्त पशु पावति अंगभंग
कृष्णा प्रसंग बहु दुर्धर भीति कारी
आह्मास यांतुनि दया कर तूंचि तारी ॥ २२ ॥
ऐकूनि तद्वचन कृष्ण ह्मणे तयाला
कांभी तसा गिरिच रीक्षल हा तुह्माला
ने त्रेमिटाच, तुमचें बहु अन्न खातो
तो अद्रि राज तुमची विपदा पहातो ॥ २२ ॥
बोलोनिया, दिवस सात उभाच राहे
श्रीकृष्ण अंगुलि वरी गिरिभार वाहे
या, खालती ह्मणतसे गिरिच्या रहारे
जो इंद्र वृष्टि करितां करितांचि हारे ॥ २३ ॥
देवर्षि हें कुतुक पाहुनि सत्य लोकीं
जावोनिया ह्मणतसे विधिला विलोकीं
हें कायहो बहु तुह्मा कशि झोंप आली
वृष्टी पडे बहुत पीडित सृष्टि झाली ॥ २४ ॥

## गोवर्धनोत्सव.

वृष्टी किमर्थ पडते नसतां प्रसंग
किंवा करी सबल दैत्यचि सृष्टि भंग
ऐसें पुसे विधि, तया मुनि बोलताहे
नाहींच दैत्य, परि वासव कोपलाहे ॥ २६ ॥
इंद्रोत्सव त्यजुनि, गोकुळिंच्या जनानीं
गिर्युत्सवें बहुत वासव मान हानि
केली, ह्मणोनि अति वृष्टि करी बलारी
जावोनिया त्वरित तूंचि तयास वारी ॥ २७ ॥
हंसा वरी बसुनि इंद्रसभेस आला
केला अति क्रम ह्मणे विधि वासवाला
इर्ष्या निरर्थ सबलास ह तूं कशाला
रे मांडिशी, फुकट घेशिल दुर्य शाला ॥ २८ ॥
दीपावरी झडप घालुनियां पतंग
तत्काळ पावत असे अपुलाचि भंग
तीचें प्रभू सहन मत्सर तो धरावा
जाणूनि कृष्ण परमेश्वर तूं नमावा ॥ २९ ॥
सप्ताह पर्वत पहा स्वकरां गुळीनें
जेणें कसा उचलिला अपुल्या कृतीनें
कृष्णास तूं शरण जा जगदीश्वराला
रक्षी त्यजूनि मद तूं अनुज्ञ्या पदाला ॥ ३० ॥

### शार्दूल वि.

आला इंद्र अगर्व होउनि पदीं कृष्णाचिया, मस्तक
ठेवी, मागतसे क्षमा, मग हरी तन्मस्तकीं हस्तक
ठेवोनी, सकळांस बोलत असे, प्रत्येक वर्षीं करा

## गोवर्धनोत्सव.

हा उत्साह, ह्मणोनि लोक धरिती याच्या बहू आदरा ॥ ३१ ॥
थोरानीं धरिला करीं जरि नसे पाषाण, तोही पहा
होतो सर्व जगांत पूज्य, बरवा आहे जगीं न्याय हा
इशानें धरितां करीं, जडहि तो गोवर्धना द्रीजरी
पाषाण, स्तुत पूजित स्थित असे लोकांत देवापरी ॥ ३२ ॥
शीतोष्णा द्युप सर्ग सोसुनिहि जे लोकोपकारी, तया
देतो इश्वर हात, यांत न धरा संदेह, ध्या, ह्या नया
वारा ऊन सुवृष्टि सोसुनि करी गाई गुरां पोषण
त्याला देऊनि हात, इशचि पहा कैसें करी पोषण ॥ ३३ ॥

--------

## भाऊबीज.

यम द्वितीया सकळा जनाची
बहील आहे भगिनीच साची
करीतसे ही सकळास भाऊ
बीज, स्वयें देउनि फार खाऊ ॥ १ ॥
लोकीं द्वितीया भगिनी कनिष्ठा
होते, द्वितीया मजला गरिष्ठा
वाटे, पहा घालुनि गोड गोड
ओवाळिते फार करूनि कोड ॥ २ ॥
ओवाळिणीची भगिनीस आशा
लोकीं असे, केवळ मोह पाशा
गुंते, हिचें विश्व समग्र भाऊ
खाऊं पिऊं घालितसे हि न्हाऊ ॥ ३ ॥
ही शुद्ध पक्षस्थ असे द्वितीया
मालिन्य हीतें न रुचे, नरींयां
तिथीस, वस्त्रें अमलेंच घ्यावी
समग्रही वत्सर सौख्य दावी ॥ ४ ॥
बहीण भावास निज ग्रहाला
बोलाविते सादर, भोजनाला
यम द्वितीयेस, ह्मणे चलाहो
दादा, तुह्मला बहु सौख्यलाहो ॥ ५ ॥

## द्रुतविलंबित.

करिन आजि सुशीघ्रचि पाकमी
बहुत गोड, मला न असे कमी
प्रति दिनींहि गळ्यांतचि घास हा

## भाऊबीज.

भडकसी, नवदा समजी दहा ॥ ६ ॥
बहुत काम तुह्मा सुटका नसे
क्षण घरीं, अतुम्हाहि सुटी असे
ह्मणुनि होइल पंगत बंधुजी
निवतणास्तव येसिल भाउजी ॥ ७ ॥
घर धणी तुमचे बहु आळशी
उठुनि चार घडीस सकाळशी
ह्मणुनि, ते तपकीरचि ओढितां
सकळही दिन घालविती रिता ॥ ८ ॥
ह्मणविती अळशांत शिरोमणी
सण निमित्त तशांतहि खेळणी
सहज नक्त तुह्मास इहो, अका
जरि घडे, तरिकां नच आइका ॥ ९ ॥
बडबडा, असुच्या अळसें तुह्मा
गरज काय, बहू करितें क्षमा
जरि तुह्मा भगिनी प्रिय होतसे
अधिक भाषण सोडुनि, या, कसे ॥ १० ॥
ह्मणतसे मग बंधु हसूंनका
त्वरितजा, स्वयपाक करा अका
आजि बहूत सुगी तुमची असे
भरचि फार भरी वरि होतसे ॥ ११ ॥
वडिल बंधु कनिष्टसही वरा
ह्मणतसे सकळा भगिनी घरा
सकळ वाटुनि वाटुनि आपण
त्वरित जाउं करूं समतोषण ॥ १२ ॥
येवोनी भगिनी गृहास करिती बंधू सुखें भोजन

## भाऊबीज.

ओवाळी भगिनी सहर्ष, तबकीं घेऊनि नीरांजन
कोणी मोहर घालि, होन, पुतळी, कोणी रुपाया, गणी
ती ताटांतिल, तुष्ट होउनि बहू घेऊनि ओवाळणी ॥ १३ ॥
माझी ही जमली पहा किति तरी ओवाळणीगे सये
झाली काय तुला, निवेदि मजला, माझी पहा, बैस, ये
ताईला किति माहली, मनिसही, काशी अकाला किती
अन्योन्या प्रति दाविताति भगिनी काहीं, किती झांकिती ॥ १४ ॥
कोणीही ह्मणती बहूत अमुचा दादा असे चांगला
माझ्या बंधुस रोजगार नुकतां कोणी ह्मणे लागला
काहीं जें करणें कधींहि न रुचे दादास तें थोडकें
राजाचें घर होय थोर इतरा, झालें जरी मोडकें ॥ १५ ॥
सासू बोलतसे सुनेस, कितिगे माहेरिचें सांगशी
आहे ठाउक हें, पुरे पडपर्कीं, तूं बोलतां भागशी
सासू बाई तुह्मी उगीचाचि बसा, कां बोलता फारशा
बाई ढाल गजा सुना घरिं घरीं ह्या काळिच्या ह्या अशा ॥ १६ ॥
त्याचा मान बहूत होय भगिनी पासूनि, ओवाळणी
घाली पुष्कळ जो, गरीब असतां, काहीं न ती त्या गणी
वाटे ह्या भगिनी समस्त असती ओवाळणीच्या, पहा
विद्याहीच वहीण, मान करिते जी निर्धनाही महा ॥ १७ ॥
भावाला ह्मणते कनिष्ट भगिनी द्या, माणकाची मुदी
मोत्याहूनि सुरम्य तूं ह्मणतसे बंधू मन:कौमुदी
दादा, बोलुनि गोड, कां ठकविता, वर्षास मी मागतें
ओवाळीन तुह्मा, अगोदर मुदी घेवोनि, मी सांगतें ॥ १८ ॥
आहे काय हिच्या घरांत कमती, कामा गते अंगठी
देतो कांन ह्मणा उगें लटुपटू, लावूनिदां ठीसठी
नान्या मागतसे, नहातुनि, सुटे, तो मेहुणा, त्याकडे

## भाऊबीज.

ओढा भावजयींस, ती, ह्मणतसे त्याचें असे वांकडे ॥ १९ ॥
बंधु नेसुनि बैसती सधनजे पीतांबरातें, तया
आणोनी बहु थाट पाट करुनी, वेतामधे त्यांचिया
राहे, निर्धन मूढ बंधुस ह्मणे घे धाबळी, नेसती,
तूझें जेवण कोपऱ्यांतचि सुधें होईल, हे हासती ॥ २० ॥
लक्ष्मी हीच बहीण वाटत असे सख्खी, बहू पाळिती,
लोभानें तिचिया, समस्त भगिनी होऊनि, ओशाळिती
लोभाच्या भगिनी तयांस ह्मणती सख्या, न ते जाणती
लक्ष्मी तुल्य जगीं दयालु भगिनी सांगा असे कोणती ॥ २१ ॥
शालूद्या, खणद्याच, तानवडद्या, कंठाहिद्याहो मुद्या
घेवोनीं भरल्या किती तरि, जशावाहोनि जाती नद्या
आहे तोंवरि घेउनी मग उद्या कोणी पुसेना, अशा
लक्ष्मी वाचुनि ह्या समस्त बहिणी लोकीं ह्मणाव्या कशा ॥ २२ ॥
मी भीमा प्रति भाउबीज करितें, कांता हरीची ह्मणे
माझी ही पुरवा हऊस सखया, जा, त्यास आमंत्रणें
बोलि कृष्ण भरीस या पडशिकां, खादाड तो केवढा
धान्याचा फडशा करील सखये, हेतू त्यजी एवढा ॥ २३ ॥
बोलेश्री, न उणें अह्मास, कितिसें खाणार तो, पाहुंद्या
मी वाढीन तयास पोट भरुनी, जा, बोलवा, हो, उद्या
ऐसा आग्रह पाहुनी, मग हरी आमंत्रणातें करी
येई चालत, कांपवी धराणि तें, तोभी महीं लौकरी ॥ २४ ॥
भीमानें उपडूनिया वटतरू, मार्गींच पत्रावळी
मोठी कोसभरी करोनि आणिली, ऐसा पहातोवळी
जेवाया बसतां लवकर करा चौरंग अद्रीपरी
बोले, रुक्मिणि, वाढ भूक मजला भारी करी घाबरी ॥ २५ ॥
न्हाऊं घालिन बंधु राज, ह्मणते ती रुक्मिणी त्याजला

## भाऊबीज.

राहो न्हाण तुझें, क्षुधें करुनिया मत्प्राण हा गांजला
ऐकोनी मग रुक्मिणि निघतसे वाढावया सत्वर
तो नाजूकाचि राजपुत्र, ह्मणुनी मागेंच घेईकर ॥ २६ ॥
हळू हळू वाढितसे तयातें
मनीं बहु क्रोधचि येइ त्यातें
घरांत ती वाढुनि शाकजाय
आणी पदार्था तर तोंचि खाय ॥ २७ ॥
एका पदार्थां सह भेट नाहीं
अभ्यास, तो चाटित बोट पाही
तोंडाकडे, ती प्रति पाठ मोरी
होऊं न देईच असा अघोरी ॥ २८ ॥
भातास भाजीस न गाठ येई
क्षण क्षणा फाराचे पाठ घेई
ताई असें चाळवितां कशाला
बोलावुनी मांडितसा, हशाला ॥ २९ ॥
पोळ्या, भात, वडे, खिरीहि, जिलिब्या, लाडू, बहू झोडिले
भाज्या, पापड, लोणचें, चिकवड्या, जे वागगे वाढिले
तें सारेंच करोनि चट्ट, नुकता बैसे जसा भोजना
भैष्मीची काटे, वाट वाढुनि दिली होतां, धरी वेदना ॥ ३० ॥
हें नाजूक बहूत बाळ ह्मणुनी ठाऊक पूर्वी जरी
होतें, भानगडींत ह्या न पडतें कालत्रयीं मीतरी
भैष्मी बोलतसे मनांत, उदरीं याच्या शिरोनी जसा
आहे राक्षस, पाहिला न कधिही मोठा अधाशी असा ॥ ३१ ॥
दारीं कृष्ण तशांत ये, तंव ह्मणे भैष्मी, धुवा पायहो
तों भीमास बहूत धाक पडलाकीं, पकिला हा नहो
आहे फार कुचाळ, पोट अरधें माझें असे, त्यांत हा
बैसे येउनि भोजना तरि, पला एकादशी होग, हा ॥ ३२ ॥

## भाऊबीज.

भीमाच्या वदनाकडे बघुनिया भैष्मी ह्मणे, याजला
दृष्टी होइल लेकरास, ह्मगुनी पायावरी घ्या जला
पूर्वी पाय धुवा असें अइकतां दुग्धा मनाला पडे
ऐके माधिल वाक्य तों उलगडा होतां तया आवडे ॥ ३३ ॥
देवानी मग कृष्ण आंत, ह्मणती आरंभ झाला कधीं
जेवा स्वस्थ पणें, जशीनच निघे गुतोने माशी मधीं
आली सान्निध भाउबीज दुसरीही, एकदां होऊंद्या
भैष्मली पुरती करोनि अपुली हाऊसही घेउंद्या ॥ ३४ ॥
झाला फार उशीर यास्तव तुह्मी कांहीं नहो जेवला
घेतां साखर सुंठही तरिबरें होतें, किती हो जला
त्याला, भीम ह्मणे न होय पहिला आहार, येतां श्रम
झाले, कृष्ण ह्मणे मनांत. भगिनी आहे बहू श्रम ॥ ३५ ॥
भीमाचें भरतेंच पोटजननी हस्तो द्रवान्ने असे
जाणे कृष्ण, तिणेंच खाद्य दिधलें तें, त्यास वाढीतसे
तेव्हां तत्क्षण तृप्त भीम उठला पात्रावरोनी, ह्मणे
झाला पाक बहूत सुंदर, ह्मणे येऊं कधीं पाव्हणे ॥ ३६ ॥
भैष्मी बोलतसे श्रमें घडि घडीं येण्या मधे कायहो
आतां लोभ असो, नका श्रम करूं, माझी स्मृती मात्र हो
कांहीं न्यून असेल तें भरुनियां पीटांत घाला, असे
मोठें पोट तुह्मास साठवण हें शोभा बहू देतसे ॥ ३७ ॥
जेवाया भगिनी यमास यमुना याया ह्मणे त्यानसे
संधी, आज उद्या करी, परि बहू कामांत तोही असे
तो एक्या दिवसी बळें स्वसदनी नेऊनि न्हाऊं तया
जेऊं घालुनि मागते, तिथिसया वर्षास हो याच या ॥ ३८ ॥
भाऊजे भगिनी गृहींच करिती तीच्या करें भोजन
तेहो ओताचि रायु, आणिक सुखी, संहृष्ट हो तन्मन
तीतें हें दिधलें यमें, ह्मणुनियां जे सोदरीच्या करें

## भाऊबीज.

आजी भोजन पावती, सकळही त्यांची विपत्ती सरे ॥ ३९ ॥
ओटीवरी दीप जिन्यांत दीप
माडीवरी दीप गुरां समीप
गच्चीवरी दीपाचि दीप रांग
लक्ष्मी स्फुरे मूर्तचि काय सांग ॥ ४० ॥
दीपावली हें बळिराज्य आहे
कोण्याहि मार्गी तम त्यान साहे
कोठें कुमार्गी न पडेच पाय
कधींहि कोणा न घडे अपाय ॥ ४१ ॥

## धनुर्मास.

### इंद्रवंशावृत्त.

पौषा मधें प्रत्यहि हेचि होय सण
होती धनुर्मास जन प्रतोषण
बोलाविती स्वस्व गृहांत भोजना
सानंद इष्ट स्वजना सुहज्जना ॥ १ ॥
थंडीत आलस्य बहू उठावया
येतें, परी फार तिला सहावया
साहित्य उष्णा खिचडी करीतसे
ही शीत भीती सकळा हरीतसे ॥ २ ॥

### इंद्रवज्रावृत्त.

थंडीन सोडी खिचडीन सोडी
कैसें करावें उभयत्र गोडी
दोघीसही तुल्यचि मान देती
सौख्यास जे दक्षण मान घेति ॥ ३ ॥
थंडी गुलाबी लववीच अंग
भारी करी चित्त उडोनि दंग
जाणोनिया मार्मिक तत्कतिलि
बक्षीस देती खिचडीच तीला ॥ ४ ॥
स्त्री तुल्य थंडी भिजवी जनातें
याते समाना बहु भोजनातें
घालीतसेही खिचडी सकाळीं
ही गुंतवी फाराचि मोह जाळीं ॥ ५ ॥
गोळे तुपाचे बहु घट्ट घट्ट
खावोनि लोणी करितात्ति चट्ट
ती औषधी ही खिचडीच आहे

## धनुर्मास.

शीतार्त हीच्या पुढती नराहे ॥ ६ ॥

## शार्दूल विक्रीडितवृत्त.

झाला मद्रथ हा तयार, मजला घाईच कामावरी
जाण्याची, बहु वेदना करितसे पोटार्थ ही चाकरी
मातेंही प्रिय होय तूप खिचडी ऐसें बहू वाढवी
तन्मा हात्म्य, पडे नऊन तंव ती खाऊनि जातो रवी ॥ ७ ॥
थंडी काय करी उठालवकरी लोण्यासवें भाकरी
घ्या सोलेहि भरीत आवड जरी पोळीच घ्या साखरी
घ्या घ्या खीर पुरी बरी दिसतसे कीं आवडी तीवरी
इष्टातें जन आदरी बहु धनुर्मासा मधें यापरी ॥ ८ ॥
विश्वाच्या कृति दर्शनार्थ फिरतो भानू पराधीन हा
साहे तोन विलंब काय, ह्मणुनी हा लाल रोषें, पहा
घाईनें खिचडीच खाउनि निघे, तृष्णार्त झाला असे
हेमंतीं ह्मणुनीच हा रथ पहा वेगेंचि काढीतसे ॥ ९ ॥

..........

## संक्राती.

चाकाची गति होय मंदचि पुढें, व्हावें तया ओंगण
या साठी तिळ दान सूर्य कथितो वाठे, मणाचे मण
देती सर्वहि तीळ, तेल मगतो चाकास लावीतसे
हेमंती ह्मणुनीच सत्वर गती त्याच्या रथा येतसे ॥ १ ॥
प्रेमानेंच समस्त दान करणें हे योग्य आहे सदा
सत्काराविण दान पुष्कळ हितें कीर्तीन देई कदा
स्नेहाने तिळ मात्र दान करितां सस्नेह, याचें फळ
मोठें, जाणुनि तीळ दान करिती संक्रांतिला पुष्कळ ॥ २ ॥
पोटीं फार असे, कधींच न दिसे बाहेर, तो होतसे
सख स्नेह, तुह्मीहि गोडचि वदा घ्या गूळ, व्हातीळसे
ऐसें बोलुनि तीळ गुळ सकळ स्नेही तसे बांधव
देती घेति परस्परें करिति हा संक्रातिचा उत्सव ॥ ३ ॥

## वसंत तिलकावृत्त.

घालोनि तीळ तबकांत परस्परातें
देती घरोघरिं करोनि महादरातें
नाना प्रकार हलवे घरिं एक मेका
देती, सुरम्य करितााति कथा अनेका ॥ ४ ॥
जामात येवुनि घरीं श्वशुरास देतो
सासूस तीळ मग आपण तीळ घेतो
राहुनि आड मुख पाहतसे पतीचें
कन्या, असे मन संतोष बहूत तीचें ॥ ५ ॥
सासू ह्मणे क्षण बसा, हलवा तुह्माला
देतें, पहा बहुत शुभ्र, मुखांत घाला
केला स्वयेंचि अमुच्या घरि आवडीनें

## संक्रांती.

जावाई हो, बसुनि खा, बहु आवडीने ॥ ६ ॥
जामात घालुनि मुखीं ह्मणताति गोड
आहे, बहूत हलवा न दिसेच खोड
माधुर्य मार्दवसु निर्मलताहिं साची
ही वाटते उतरली जणु, निर्मियाची ॥ ७ ॥
हें आयकोनि निज मातृ समीप कन्या
सप्रेमसुस्मित मुखी बहु होय धन्या
बोले हळूंच भगिनी जवळी, न खोडी
प्रेमास होय तरि सर्व कृतींत गोडी ॥ ८ ॥
जामात घेउनि विडा, निज मंदिरातें
येतां, वधूहि मग येउनिया, दिरातें
सासूस, आणि करि वंदन सासऱ्यास
ते पावती बहुत देखुनि उत्सवास ॥ ९ ॥
संक्रांतिला वसन नेसुनि शुभ्र, जाती
कांता स्वकांत शयनावरि हेमकांति
देती विचित्र हलवे करुनी प्रियाला
वाटे सुरेंद्र पदतुच्छचि तन्मनाला ॥ १० ॥
नाना प्रकार करुनी हलवे रुप्याच्या
वाटयांत घालुनि पुढे करुनि प्रियाच्या
प्राणप्रियास ह्मणते रमणी, प्रियाहो
गोडी बहू मजवरील अशीच राहो ॥ ११ ॥
हा केशरीच हलवा बहु यास रंग
घ्या, प्रीति संतत असो अपुली अभंग
बोले प्रियेस पति, रंगवरील जातो
कांते अकृत्रिम सदाहि पहा रहातो ॥ १२ ॥
... सुरम्य हल... बहु वेलदोडे
... क्षिस तुह्मी मज द्याच तोडे

## संक्राती.

प्रीती प्रिये जरी अमूल्य, तरी कशाला
तोडे, अणीक मित मूल्यचि होत शाला ॥ १३ ॥
गोडी बदाकाशि असे हलव्यास, बाभे
तीतों तुझ्याचि अधरांत मनोभिरामे
तीही होय एक पळ मात्र नही कधीही
बाई प्रिया सतत राहु अशीच धीही ॥ १४ ॥
संक्रातिला घरि घरींहि सुवासिनीतें
अभ्यंगपूर्व खण देउनि गाति गीतें
देती बहू हळद कुंकुम एकमेका
सौभाग्य मूर्तिच जणो दिसती अनेका ॥ १५ ॥
भाळास कुंकुम, करीं वलयें, सुवेणी
प्रत्यंग शोभाति सुरम्य अनेक लेणी
देवांगनाच, परित्या अनिमेष, ह्यानां
होती निमेष, बहुधाहि तयां समाना ॥ १६ ॥
म्यान्यांत बैसुनि किती शिविकेंत काहीं
बैसोनिया निघति, वेष्टित सेवकांही
कन्या, नवीनचि विवाहित, वायनातें
वाटावया, कारिति फाराचि रंजनातें ॥ १७ ॥
येतां घरीं पतिसवें परिणीत कन्या
द्याया सवाण, पुसते तिजलागि अन्या
हा कोणगे तुजसवें, मग लाजताहे
खालीं करोनि मुखस स्मित होत आहे ॥ १८ ॥
जो द्रोण थोरचि धनुर्धर होय, त्याची
भार्या कृपी, ह्मणति जीस बहू गुणाची
हा संक्रमोत्सव तिणें विधिनेंच केला
येणे तिला बहूत शूरतनूज झाला ॥ १९ ॥

## वसंतपंचमी.

### चामरवृत्त.

माघ शुद्ध पंचमी ही वसंत पंचमी
उक्तही सणामधें सर्व मान्य सतमीं
केशरी करूनियां रंग माधवावरी
घालुनी स्तवी तया लोक हा परोपरी ॥ १ ॥
भूषणें नवीं तसें शुभ्र वस्त्र ही नवें
घेति, नृत्य गायनें रात्रि नेति उत्सवें
हार घालिती गळा, मस्तकीं तुरे तसे
लाविती, घरोघरीं रंग फार होतसे ॥ २ ॥
हा महाल यांत हे बैसुनी महाजन
पाहताति नर्तकी नृत्य चित रंजन
हाव भाव पाहतां मूढ त्यात बूडती
मत्स्य तुल्य सुज्ञ ते त्या मधेंच पोहती ॥ ३ ॥

---

## द्रुतविलंबित वृत्त.

### रथसप्तमी,

सणचि माघ सिता तिथि सप्तमी
ह्मणति सर्वहिला रथसप्तमी
रविस पूजितसे जन सर्व हा
घरि घरीं रथ काढुनिया पहा ॥ १ ॥

## भुजंगप्रयातवृत्त:

सुना बोलती सासु बाई कहाणी
रथाची वदा, मूल मोठी शहाणी
अगे पाट किंवा पिढे ना, बसाया
मिळोनी तुह्मी एकदा, या, बसा, या ॥ २ ॥
धुवा आंग साऱ्या, पहाटे उठोनी
ह्मणोनी तुह्मा सांगुनी, मी झटोनी
किती काम केलें नसे नीज रात्री
तुह्माला तयाची असे काय खात्री ॥ ३ ॥
कहाणी पुरे रोजची सासुबाई
रथाचीच सांगा, नको नित्य खाई
बसोनी रहा स्वस्थ, बोलूं नका हो
किती फोडितां शक्तिहीनाहि टाहो ॥ ४ ॥
पहा बारवंड्या कशा होत पोरी
असे हूं ह्मणायास देखील चोरी
मुलानींच डोक्यावरी बैसवल्या
बहू फूस देऊनि ह्या शीकवील्या ॥ ५ ॥
नको बाप आई मुला, बायकाच
पहा देवता, सोसवेनाच काच
बहू शीकले जोडकेंही जहाले

## रथसप्तमी,

तरी बुद्धिचा दोष काहीं न झाले ॥ ६ ॥
काशी लहान असतां कितिहो गुणाची
सर्वा अगोदरचि आंग धुई सणाची
नाहीं तिला बहुत झोंप, झणाल कन्या
ती चांगली तुज दिसे; तरि सर्व मान्या ॥ ७ ॥
मेली पुरेच किरकीर, सुखी रहागे
हे बोल आठवाति सर्व तुह्मास मागे
कन्या सुनास मचिगे मजलागि, द्याया
साऱ्या हुंकार, बहुतप्पर व्हां, बसाया ॥ ८ ॥
व्यासासनीं मग बसू निवदे कहाणी
सासू, जणो सुर गुरूस उणवि आणी
देती हुंकार सगळ्याहि मुली बसोनी
सासू वदे मग कथा बहु आदरोनी ॥ ९ ॥
बारीक भात घृत लोणकडे गुळाची
पोळी अणीक बहु खीरहि बोटव्याची
लिंबू अलें करुनि मिश्रित लोणच्यातें
वाढूनि तृप्तचि करा बहु मेहुणातें ॥ १० ॥
ती सांगतां मधुनि खोकतसे, सुनाल्या
हासून फोडिति मधूनि मधुनि फाल्या
सासू सरोष झणते, कितिगे हसाल
हे नाइकाल तरि फार तुह्मी फसला ॥ ११ ॥
काढूनियां रथ पुजा रथसप्तमीला
येईल सत्वर दया तुमची रवीला
झाली समाप्त इतकीच असे कहाणी
सासू झणे मज नमा, अइकूनि वाणी ॥ ११ ॥
कां बोज देशांतिल कीर्ति वर्मा
...रराणीं कथिला महात्मा

## रथसप्तमी.

स्यानें सुत व्याधि निरासनाला
केला जगीं हा सण सिद्ध झाला ॥ १३ ॥

## शिमगा,

### स्वागतावृत्त,

फाल्गुनांत शिमगा सण मोठा
या मधें जरि नसेलहि पोटा
सर्व लोक करिताति तमाशा
खेळण्यांत धरिती बहु आशा ॥ १ ॥
धांवती खदखदा हसताती
खेळ खेळुनि बहू रमताती
मंत्र तंत्र अवघे शिमग्याचें
एकतान ह्मणताति हिवाचें ॥ २ ॥
माघ शुद्ध पुनवेस धरोनी
एक मास जन सर्व मिळोनी
खेळती त्यजुनि कामहि सारे
आंगि फार भरलें जणुवारें ॥ ३ ॥
पौर्णिमेस करिती बहु होळ्या
पांच सात नउं झोडुनि पोळ्या
ठोकुनी बहुत मारिति बोंबा
या कृतींत नच एक हिठोंबा ॥ ४ ॥
साठ सत्तर असूनि हि वर्षे
खेळती शिशु समानचि हर्षे
होता फाराचे विलज्ज समस्त
भ्रष्टपुष्ट असती बहु मस्त ॥ ५ ॥
पोर थोर अवघेचि समान
फाल्गुनास करिती बहुमान
शंख वाद्य करुनी निजहातें
वर्णिती सकळतनू विरुदातें ॥ ६ ॥

## शिमगा.

शंख वाद्य करि तूं, ह्मणताना
रुष्ट होउनि करीच तनाना
शंख वाजाविति सर्वहि जेव्हां
होय साहजिक हर्षचि तेव्हां ॥ ७ ॥

## वसंततिलका.

पाडीनदांत ह्मणतां बहु रोष येतो
त्यातें स्वयेंचि, हलतां उखडोनि घेतो
सारे स्वये मिळुनि जें करिताति, गोड
तें वाटतें ह्मणुनि बोंब दिसेन खोड ॥ ८ ॥
आणोनि गाढव तयावरि बैसवोनी
एकास, त्यास बुरणूसाचि नेसवूनी
डोक्यावरी धरुनि सूपचि छत्र त्याची
नेती वरात बहु गोजिरिया वराची ॥ ९ ॥
घोडे पुढे बहुत चालति कोतवाल
मध्यें वराश्व धरितो बहु मंद चाल
भोंतें बऱ्हाडिजन चालति राजमार्गीं
ऐशी वरात नच पाहिल तो अभागी ॥ १० ॥
कुंभार वाड्यांतिल ठाण बंदा
अश्वांत तो अश्व बहूत खंदा
मांडी ढळेना, वरि राज बिंडा
बोले, तुह्मी स्वस्थपणेंचि हिंडा ॥ ११ ॥

## इंद्रवज्त्रा.

झाडीतलाथा बहु आरडोनी

## शिमगा,

ख्यां ख्यां करीतो, परि ओळखोनी
स्वारी, पहा जेरचि जेर झाला
त्या सोहळ्यानें वर फार धाला ॥ १२ ॥
पाठाड मोटें, बसणार पक्का
कोठें न पावे गरदींत धक्का
वाद्यें ठणाणा बहु वाजताती
बुजेन घोडा, जणु भद्रजाती ॥१३ ॥
मुंडावळी बांधुनि खेटराच्या
पलांडुच्या आणि कगानराच्या
कंठांत घालूनि हि माळिकेला
तो सोहळा फार वरास केला ॥ १४ ॥
येतांचव्हाटयांत वरात, टोळी
बधू वरें पाहुनि भात पोळी
ओवाळुनी टाकिति कीं नयास
हो दृष्टि, पावोत सदा जयास ॥ १५ ॥

## वसंत तिलकावृत्त.

तो जातिवंत जरि अश्व, तरी तयाची
हुक्की बहू उपजली, क्षण लोळण्याची
तेव्हां चितें तुरग रत्न बहूत लोळे
तेंदंपतिद्वय धुळींत बहूत घोळे ॥ १६ ॥
उत्पात तो बधुनि, तच्छमनार्थ केला
मंत्र ध्वनी ठणठणा, मग अश्व गेला
त्याचीच जात वर, फाल्गुन पंडितांच्या
बैसे सभेंत, अणखी अवळीच काच्या ॥ १७ ॥

१ अश्वांतील एक जात.

## शिमगा,

रस्त्यातुनी मग गुलाल बुका फुकाचा
सत्कार टाकुनि बहू करितात त्याचा
जें टाकिती मग वपूवरितें वदाया.
कुत्सा बहूत, न पहानवदा, चला, या ॥ १८ ॥
वारांगना त्वरित जात असे स्वमार्गें
तीच्या पुढे आणिक धांवाति पाठि मार्गें
ह्या सज्जना वरि करी मग ती सु दृष्टी
दृष्ट श्रुता न कधिही बहु पुष्प वृष्टी ॥ १९ ॥
तीच्या शिव्याहि सुमना सम लागताती
शंख ध्वनी करुनि फाराचे हासताती
सोडूनि नेसण शिरासाचे बांधिताती
निर्लज्जते प्रतिपदींहि शिव्याच खाती ॥ २० ॥
दोन्ही करें हिशर मारुनि सव्यसाची
विख्यात फाल्गुन हि, लोकहि हा, तसाची
शंखध्वनीच कारि लोक करद्वयानें
तो शूर बाण हणुनी रिपुतें ल्यानें ॥ २१ ॥
विद्या बहू न करितां श्रम, येत नाही
ही फाल्गुनांतिल कशी सुलभा जनाही
केली समग्र मुखपाट, पहा पहारे
हीच्या पुढें सकळ पंदितसंघ हारे ॥ २२ ॥
राडीमधें धरुनि टाकिति एक मेका
चेष्टा तशाच करितात पहा अनेका
पोशाक शुभ्र करुनी तिकडून आला
राडी मधें धरुनि लोटिति सर्व याला ॥ २३ ॥
पाटील देशमुख मुख्याहि कोतवाल
याचे धरोनि करितात बहुत हाल
केला जरी नृप तिनेंच बहूत लाड

## शिमगा.

कोणास कोण पुसतो घरि कोण पाड ॥ २४ ॥
नाचास जाउनि बसूं ह्मणती चलाहो
साफल्य कर्णनयनास बहूत लाहो
ऐके नगीत, बहिराच तया ह्मणावें
जन्मांत नृत्य न बघे तरि, अंध व्हावें ॥ २५ ॥
हें नाक कान मुख नेत्रहि हात पाय
ईशें दिले, न कधिंही तुजला अपाय
होउं नये ह्मणुनि, तूं विनियोग त्यांचा
खेळाकडे करुनि कां वुडशी फुकाचा ॥ २६ ॥

## साक्या,

तेथुनि उठती मन सर्वांचें नाच पहायास वळे
दिवाण खान्या मधें विलासें येउनि बसती सगळे ॥ २७ ॥
मोठया मोठया अरशामध्यें प्रतिबिंबें पडतात
एक असोनी अनेक दिसती दिवाणखाने त्यांत ॥ २८ ॥
वरती भरजरी झालर झळके पडदे लोंबाति गजनी
खालीं निर्मल बैठक सेवक वारा घालिति व्यजनीं ॥ २९ ॥
छड्या फुलांच्या हातीं घेती सुगंध गजरे हार
पडदे लावुनि वाळ्यांचे ही करिती गाराचि गार ॥ ३० ॥
गीतरसिक बहु वाद्य रसिक बहु काव्य रसिक बहु असती
समरस होउनि अमरसमाचिते सहृदय सविनय बसती ॥ ३१ ॥
लगबग लगबग साज करोनी वारवधू मग आली
संगेतबला सारंगीही घेउनि अपुली आली ॥ ३२ ॥
टकमक टकमक सकल रसिकवर, अनुपम पाहाति रूप
तृषित रसिकजननयनशरण हा, ह्मणाति रसाचा कूप ॥ ३३ ॥
अवयव सकल[illegible]नि वर्णिती ह्मणती नासा बेशी

## शिमगा.

शुक नासाही, भ्रूवल्ली ही काम धनुर्ज्या जैशी ॥ ३४ ॥
चंद्र वदन मृदु कुंदरदनही करकिसलय मृदु हाले
नयनमीन हे हृदय कदन जणु मदनाचे मारी भाले ॥ ३५ ॥
चपल चपल बहु थइ थइ नाचत हळु हळु पद टाकितसे
पदर शिरावरि आणुनी उघडुनि पळ भरि मुख झांकितसे ॥ ३६ ॥
ख्याल ध्रुपदें टुमऱ्या टप्पे प्रबंध गाते तरणे
अभिनव अभिनय पाहुनि होती वृद्ध सभाजन तरणे ॥ ३७ ॥
तालासमपद टाकितसे बहु राग अलापी नाना
नेत्रकटाक्षक्षणीं रसिकजन विसरति सकळाहि भाना ॥ ३८ ॥
सारंग्या मृदुचंग वाजतां रंग, उभा, जन दंग
होउनि बसती, चित्रें जैशी येतां नेत्रतरंग ॥ ३९ ॥
भांग जिचा बहु चांग पाहुनी, अपांगभंगाहि तैसे
सांग गायनीं लुब्ध, खाउनी भांग बैसती जैसे ॥ ४० ॥
पांयीं पैंजण, सतार वाजे, लाजे घडिघडि, साजे
रंगाची ही मूर्तिच, अथवा दिव्य स्त्रीच विराजे ॥ ४१ ॥

## शार्दूल विक्रीडित.

झाला नाच उठोनि सर्व निघती स्वस्वग्रहीं भोजना
मल्लक्रीडनदर्शनार्थ करिती अन्योन्य उत्तेजना
माती घालुनि तांबडी मृदु मृदू तालीम केली जिथें
येती लोक सहस्रशाजमुनिया गर्दीच झाली तिथें ॥ ४२ ॥
अड्डे सर्वहि तालिमींतिल पहा येती थव्याचे थवे
पट्टे सर्व पहालवान जमती वस्ताद ही आघवे
अंगीं रंग, करांत दंड नयनीं आहे विभूती, जणो
भीमाचे पुतळेच दूताचे वळी कीं, अंतकाचे ह्मणों ॥ ४३ ॥
स्तंभानुल्यांचे बाहु दंड असती, विस्तीर्ण वक्षस्थळ

## शिमगा,

ज्यांचें भाळ विशाळ, ज्या वरि पहा आलें कसें टेंगुळ
मांड्या दंडाहि पोटऱ्याहि फिरल्या हती जणो डोलती
मस्ती फार समस्त लोक दिसती ज्याना बळा खालती ॥ ४४ ॥
पट्टे दोन तयार तुल्य उठडे कुस्तीस दोघे जण
ठोकोनी, भुजदड, तख्वाने उठे भूमी करी दणदण
होती सन्मुख वामसव्य सरती अन्योन्य हस्ता प्रती
स्पर्शोनी धरिती करीं मनगटें कुस्ती बहू तीव्रती ॥ ४५ ॥
कैचो घालुनि मान दाबुनि पहा अन्योन्य हे झुंजती
पायीं पाय भुजीं प्रबळ हे घालुनिया साजती
व्याघ्रा तुल्य धरून खालवर हे होती क्षणानें पहा
दोघांतून न एकही हरतसे कुस्ती अशी दुःसहा ॥ ४६ ॥
कुस्ती लागुनि चार होत घटका कोणी न मागें हटे
जातो कोणमधें नलागाचि असे कोणी न तेथे झटे
पट्टे मत्त तयास शुद्धिच नसे, भारी शतामाजितें
होती मार्मिक जे तयाहि न कळे कीं कोण कोणा जिते ॥ ४७ ॥
घाली एक अमोच्य पेच, दुसरा काढुनि मागेच तो
होतो, तत्क्षण दंड थापटुनिया अंगावरी धांवतो
झोंबी खेळुनि खेळुनी अवाचेना पृथ्वीवरी पावले
दोघेहीं, मग तत्सपक्ष उठुनी दोघांकडे धांवले ॥ ४८ ॥
दोघांची समताच पाहुनि तयां बक्षीस अत्यादरें
पागोटी मग बांधुनी वरि तुरे लावूनि देती करें
यांची पाठ बहूत थोपटुनिया नों बैसवीती तया
तों जोडी दुसरी उठे झडकरी कुस्ती बळें घ्यावया ॥ ४९ ॥
दोघे तुल्यवयस्क, एक दिसतो कीं माजला ठोणगा
जोडीचा कृश हो जरीं दिसतसे भेदील कीं हा नगा
जोडी पाहुनि सभ्य लोक ह्मणती कुस्ती तयांची करा
जाणोनी सबळा बळा जुगवितां, हें काय, नीती धरा ॥ ५० ॥

## शिमगा,

होता जो कृशमल्ल एक, उठला वस्तात त्याच्याच तो
कुस्ती घेइल, खातरीच ह्मणतो, हा अल्पही दीसतो
व्याघ्राचा शिशु होय अल्प तरिही तो टोणग्याला धरी
वेगें टाकुनि झांप तत्क्षण, वळे गर्वास त्याच्या हरी ॥ ६१ ॥
ऐकोनी अपमानवाक्य दुसरा तो मल्ल गर्वे ह्मणे
पोराशीं मजशीं बरे दिसतसे कुस्ती तुझा लावणें
ऐसें बोलुनि ताव देउनि ह्मणे कल्यावरी मल्ल तो
ठोकोनी भुजदंड चंड, उठतो गर्वे बहू बोलतो ॥ ६२ ॥

## वसंत तिलकावृत्त.

हें काय पोर मजशीं करणार कुस्ती
याची क्षणांत जिरवीन वृथाच मस्ती
मी काढितों प्रति दिनीं हि हजार जोर
माझ्या पुढें किति टिकेल अशक्त पोर ॥ ६३ ॥
देतों झुगारुनि पहा झुरळा समान
याचें उगें चढाविती जन फार मान
ऐसें बहू बडबडे परितो समोर
पठ्ठा उभा नच वदे न धरीच घोर ॥ ६४ ॥
झोंबी जुळे मग परस्पर, वाळका तो
नाईं सटा सट सुटोनि धरूं पहातो
तो लठ्ठ, त्यास बहु दात किटीस येई
तो मल्ल रोड असतां श्रम त्यास देई ॥ ६५ ॥
रेड्या समान जरि तो बहु मल्लभारी
त्याला धरोनि कृश मल्लाचि पेंच मारी
तो भोपळा मग पळांतचि चीत झाला
तद्वर्ग यास भिवुनीच जणो पळाला ॥ ६६ ॥

## शिमगा.

तो तोंड वासुनि पडे बहु टाकि धापा
ज्याणें बहूत हाणिल्या स्वमुखेंचि गप्पा
आली कशी मज ह्मणे मग मल्ल घेरी
वारू झपेट अथवा मज भूत फेरी ॥ ५७ ॥
सर्वा मधें बहु बळाढय पहिलवान
आहां तुह्मीच, पडला तरि काय मान
हानी, नसे जय पराजय एकल्यास
व्हा ष्ट पुष्ट, मिळवा अणखी जयास ॥ ५८ ॥
जो पाडणार कृश मल्ल तयास घेती
साऱ्या मधें वलय बक्षिस त्यास देती
कुस्ती पुन्हाहि तिसरी चवथीहि होती
एका घडींत बहु मौजाचि मौज होती ॥ ५९ ॥

## स्त्रग्धरावृत्त,

मैदानीं सर्व येती सकळहि पशुच्या लाविताती लढया
हत्ती घोडे गवेही जमाति नर बहू मौज मोठी बघाया
हत्ती हत्तीशिं घेई माहिष हि महिषें, एडके एडक्याशीं
बैलाशी बैल झोंबी, बहुतचि गरदी आंत जाईन माशी ॥ ६० ॥
रेडा रेड्याशिं जुंझे, तुरगहि तुरगें, लांडगा लांडग्याशीं
वाघाशीं वाघ झोंबे, हरिणहि हरिणें, उष्ट्र ही उष्ट्रकाशीं
आवेशें जुंझ घेतो गवयहि गबयें, खेळती युद्ध मोठें
दाणा दाण प्रचंड ध्वनि करिति नसे, रीग मुंगीस कोठें ॥ ६१ ॥
रेडा आहे बहु हा प्रबळ परि कसा वेसणीं आकळीला
वासी तोंडास, धैर्याप्रति धरुनि पहासिद्ध होतो कलीला
नाकीं गुंतोनि गेला ह्मणुनिच दिसतो दीन, धावुनि येता
होवोनी मोकळा हा तरि खचित महा दुष्ट हा प्राण घेता ॥ ६२ ॥

## शिमगा,

आन्यान्य व्याघ्र दोन्ही गुर गुरकरुनी पाहती फार रोषें
सारी भूमी दणाणे डर डर डरक्या फोडितां घोरघोषें
भूमीला पुछ पंजे हपाटिति बघतां लोक सारा थरारे
बांधा बांधा गळयाच्या वळकटचि बहू साखळ्या आखडारे ॥ ६३ ॥
दोघे धावूनि शृंगें सुवृषभ थडका मारिती थाड थाड
झोंबी खेळोनि मोठी झट झट, करिती मोकळें हाड हाड
मोठाले एडकेही थडक निज शिरें मारुनी एकमेका
भीती देती समस्ताप्रति, न धरवती रक्षकांही अनेका ॥ ६४ ॥
हस्तीच्या मस्तकीं हा ऋकच खरतर प्रोच घेउनि हातीं
राहे माहूत, टेकी निजचरण तया हस्तिच्या दीर्घ दांतीं
मारी चौताळुनी जों गज शिरिच उडी व्याघ्र, तों माहुतानें
व्याघ्राचीं दोन खंडें क्षण नहि न लगतां पाडिलीं कर्वतानें ॥ ६५ ॥
हतीचा बांधुनीयां चरण दृढ बहू शृंखला लांब केली
व्याघ्राच्या ही गळ्याची शिथिल करुनिया शृंखला सोडियेली
उड्डाणानें करीच्या शिरिं जंव चढतो व्याघ्र, तों हस्तिनें त्या
शुंडेनें व्याघ्र केला अवळुनि हतसा रक्षिलें त्याहिं नेत्या ॥ ६६ ॥
सन्यासी एक होता मनिं ह्मणत असे की, मजाहीं बघावी
राजाच्या पालखींत त्वरित बसुनियें, वासना कां धरावी
ऐशी त्याणें, वसावें विजनिं, उपटुनी सूळ खांद्यास ध्यावा
कांहो, मोठी करोनी खटपट, फजितीपात्र आत्मा करावा ॥ ६७ ॥
त्याची झाली फजीती. उचलुनि शिबिका आंत घालूनि मान
भोया सुद्धाहि धावें हिकडुनि तिकडे उंठ, तो सारवान
मानेलावांकवोनी हपटावि शिबिका मोक्ष तेव्हांच त्याला
सत्संगानें भुयाही त्वरितचि चढती मुक्तिच्या ते पदाला ॥ ६८ ॥
कांतेला आण जागे तिजविण न सुचे चित्त लागेन कोठें
वाटे भारी स्त्रियांचें मन, कठिण तसें धैर्यही फार मोठें

## शिम्गा.

जाजा तीतें निवेदी झडकरि तिजला सांगकीं, हातजोडी
क्रूरेत्वत्प्राणनाथ, प्रतिपादिं झुरतो प्रीति त्याची न मोडी !। ६९ ॥
दूती येवूनि सांगे त्वरित चल सखे, लागलें वेड काय
स्वप्राण क्रोध कोणी धरि तरि, पदरीं घेतसे तो अपाय
क्रोधाची जात खोठी त्यजुनि सरल हो, चालुनी लाभ आला
घेघे जोडून जातें चलचि वय, न तूं व्यर्थ नेई तयाला ॥ ७० ॥
दूती जा सांग त्यातें, समजुनि मजला प्रेम आलें ह्मणावें
चित्ताचे फार खोटे पुरुष असतिंगे वाक्य त्यांचें गणावें
कोणरे, जातो तयाचा समय मजविणें तेविमाझाहि जाय
कोणाचें कोण आहे तळमळ तरि मीं कां करूं लाभ काय ॥ ७१ ॥

## पंचचामरवृत.

नको नको असें ह्मणूं, तुझ्या विणें घडी तया
युगा समान जातसे करी तयावरी दया
सखे तुझा पती ह्मणे, सदा तुझाच दास मी
चुकी घडेच किंकरा कडूनि होस तूं क्षमी ॥ ७२ ॥
सदाहि तूंचि मत्स्मृती करी, मला न होतसे
स्मृती मनावरील धर्म, मत्समीपितें नसे
तु वांचितें हिरोनिया करोनि वश्य ठेविलें
तुझ्या मनासवें मिळोनि तें तिथेंच राहिलें ॥ ७३ ॥
असें स्वकांत वाक्य दूतिच्या मुखेंच ऐकुनी
निघे त्वरेंच नायिका प्रिया समीप येउनी
करी मुखेंदुदर्शनें प्रियास हर्ष फार ती
दळे कशी परस्परें दृढा अकृत्रिमारती ॥ ७४ ॥
सखे शिरोगृहीं बसूं सुरम्य वद्ध हें नवें
विनोद फार फाल्गुनां मधें परस्त्रियासवें

## शिमगा.

विमूढ ते करोनियां बहूत हर्ष पावती
गलोगली जमूनियां पहा कितीक धांवती ॥ ७५ ॥
पहा शिरावरी भरोनि अंबुकुंभ घेउनी
त्वरोंचि जाय अंगना, तिच्या समीप येउनी
हळूंच लोक मस्तकस्थकुंभ घेउनी करें
सरून, तीस बोलती किमर्थ चित्त घाबरें ॥ ७६ ॥
नितंबिनी वदे किमर्थ कुंभ मच्छिरस्थ हा
हिरोनि घेतला, तुह्मा करील दंड भूप हा
उरींहि दोन कुंभ एक मस्तकींहि भारहा
कमी करावयास युक्ति योजिली अशी पहा ॥ ७७ ॥
तयास भामिनी वदे, तुह्मी बहूत दांडगे
जसे मृगीस वेष्टिताति दुष्ट लष्ठ लांडगे
तसे तुह्मी, तुह्मास दोन हात फार भार हा
त्वरें करीन हाल काच, तोडुनी तया पहा ॥ ७८ ॥
खिजे, ह्मणूनि तीजला मुलें बहूत हासती
सखे मला समस्त मूर्ख हे पशूच भासती
असा अनेकधा विनोद हे करूनि रंगती
कशी तरी पुढे घडे कळेन याजलागती ॥ ७९ ॥

## स्रग्धरावृत्त,

ऐसे हे खेळ नानापरिजन करिती फाल्गुनाचे, मुखानें
बभित्सोच्चार पूर्वध्वानि करिति बहू खेळताती सुखानें
क्रीडा ग्राम्या बहू ज्या असाति वदवती त्यान आह्मास, कामें
होती ज्या, ते कधींही फुकट वय, न हें घालवीती रिकामें ॥ ८० ॥
दाढा विक्राळ जीच्या गिरिसम कुचही नासिका रंध्र घोर
बाहु ताळा समान प्रखरतर नखें अंकुशा तुल्य थोर

## शिमगा.

नेत्रे बारीक लाल, प्रसृत मुखाजिचे गव्हरातुल्य लांब
जिव्हा, मांड्याहि शुंडा समादि साति जिच्या पोटऱ्या स्थूल खांब ॥ ८१ ॥
काळीकाळीकाभिल्ल, प्रविकट दशना राक्षसी घोर मोठी
होला नामी यमाची प्रतिकृतिच जणो, भीषणा लंबितोष्ठी
कामागारीं समस्तामरनर धरूनी ठाकिते, द्वाड भारी
तत्पीडेतें सुरानीं भिवुनि विनवुनी प्रार्थिला अधकारी ॥ ८२ ॥
दुष्टाती देइ कष्टा मग पशुपतिनें फाल्गुनीपौर्णिमेला
सायंकाळीं विनष्टा करुनि, सुरवरा हर्ष अत्यंत केला
मागे वर्षास, ती कीं सकळ जन अशा उत्सवातें करीत
भीभत्सोच्चार शंखध्वनि, मजवर द्या ह्या सणा आदरीत ॥ ८३ ॥
कामागारांत तीच्या पडुनि सुरनरीं, वेदना शंभुला जे
सांगोनी शंख केला, तदनुकृति जगीं चालते, चित्त लाजे
बोलायाला, परीहें मुनिकथित असे मासमाहात्म्य त्याच्या
आधारें वर्णितों हा, ह्मणुनिच कृतिला साहिजे वाणि त्याच्या ॥ ८४ ॥

## रंगपंचमी,

### कामदावृत्त.

फाल्गुना मधे वद्यपंचमी, बोलती हिला रंगपंचमी
खेळती बहू रंग सर्वहा हृष्ट होतसे सर्वही मही ॥ १ ॥
पातळें मृदू शुभ्र नेसती रंग घेउनी सर्वही सती
हृष्ठ होउनी ह्या पती सवें रंग खेळती फार उत्सवें ॥ २ ॥
गोकुळा मधें रंग होतसे रासमंडळा माजि राजसे
कृष्ण खेळतो रंग भूतळीं देव पाहती हे नभेस्थळीं ॥ ३ ॥
घेउनी सवें कृष्ण गोपिका वेणु वाजवी लाजवी पिका
राग रागिण्या सर्व उठती एण येउनी थक्क ठाकती ॥ ४ ॥
वेणु वाजतां लाज सोडुनी गोपिका घरीं काज टाकुनी
बोलती, धरा वस्त्र भूषण रंग घ्या, करूं कृष्णतोषण ॥ ५ ॥
रंगमूर्ति जो कृष्ण त्यावरी रंग गोपिका घालिती करीं
त्यावरी बहू रंग आदरें कृष्ण टाकितो आपुल्या करें ॥ ६ ॥

### शार्दूल विक्रीडित.

बुढ्वा मंगळ फाल्गुनांत करिती काशींत सारेजन
गंगे माजि अनेक घालुनि पहा नौका मनोरंजन
वाद्यें वाजति नृत्य गीत करिती क्रीडा विचित्रा, असे
गंगाही जननी, तिचे शिशु जन, प्रोत्साह त्या देतसे ॥ ७ ॥
नावा घालुनिया जळांत फिरती नावास चोखाळिती
नावांचेंचि असे महत्व ह्मणुनी नांवांस संभाळिती
नावानीं तरती धरूनि असती नांवास जेव्यास हा
बुढ्वा मंगळ सूचवी जणु सुखें नावांत कैशी पहा ॥ ८ ॥
नावालाच जपा जपा बहु तुह्मीं नावावरी चालतें
सारें राज्य बहूत जंतु असती नावाचिया खालतें
नावानीं तरती तयास जपतां, रंध्रें तळीं बूडती,

## रंगपंचमी,

वृद्धा मंगळ सांगतो बसवुनी नावांत लोकांप्रती ॥ ९ ॥
गंगा रम्यतरंग आंत झळके दीपालि रत्नापरी
रत्नेंही पडताति आंत करितां क्रीडाहि नानापरी
काढा या उदकीं न भेदचि दिसे, गंगौघरत्नाकर
स्त्रीरत्नें निजरत्न शोधुनि कशा ह्या काढिती सत्वर ॥ १० ॥
सारे रंग गुलालही उडविती ही फाल्गुनी पंचमी
येतां हार मणी धरोनि रमणी आनंदतो ह्या सर्णी
घेवोनी पिचकारिया उडविती रंगास गंगाजळीं
संगानें बहु रंगताति पतिच्या बैसोनि नौकास्थळीं ॥ ११ ॥
नौकेचा अरसे महाल सुसती अभ्यंतरीं बैसती
एकाच्या प्रतिमा अनेक असती संगें तयाच्या पत्नी
घेवोनी उडवावया पति वरी स्त्री रंग टाकीतसे
तो जातो प्रतिमेवरी प्रतिपदीं खिन्ना वधू होतसे ॥ १२ ॥

## इंद्रवंशावृत्त,

आले पुण्याला विजयी महादजी शिंदे महाख्यात जगांत सावजी
राज्यावरी माधवराव पेशवे होते सवाई सुख फार आठवे ॥ १३ ॥

## शार्दूलविक्रीडित.

नाना जाति महादजीस उठुनी भेटावया, भेटती
श्रीमंतांस महादजी त्वरितची येवोनिया. हर्षती
देवोनी नजरा विनंति करुनी श्रीमंत बोलावले
डेऱ्याला मग रावमाधव समारंभें तया पावले ॥ १४ ॥
शिंद्यानीं शिरपेच उज्वल कडीं तोडे तुरा पोंचिया
[illegible]ल्या रत्नखचीत आणि कुडक्या कंठयाहिं पांचाचिया
[illegible]ी भिकबाळी अन्याहि बहु संभूषणे दीधलीं

## रंगपंचमी.

श्रीमंतें मग घेउनी सकळही अंगावरी घातिलीं ॥ १५ ॥
हत्ती एक महान दिग्गज जसा, उच्चैःश्रवा दूसरा
ऐसा उत्तम अश्व एक दिधलाही पालखी आदरा
ऐसें बोलुनि नालखीहि दिधली हि ढाल तल्वारही
घ्या, शिंदे ह्मणती तुह्मी ह्मणवितां राजन्वतीही मही ॥ १६ ॥
घेवोंनी बहु सत्कृतीस निघती श्रीमंत ते नालखी
मध्यें येउनि बैसती मग निघे स्वारी तिच्या सारखी
कोणी दृष्ट नसेच अश्व गजही होती हजारो अहा
स्वारी थाट करोनि सर्व निघती येती पुण्याला पहा ॥ १७ ॥
सर्वांच्या पुढती निशाण पटका मोठा जरीचा असे
वाजंत्री बहु नौबताखण खणा मोठा ध्वनी होतसे
शिंगें वाजति शेकडो घडि घडी कर्णें, तुताऱ्या तशा
बंदूका सुटती लखालख विजा वर्षा प्रसंगीं जशा ॥ १८ ॥
तासे फारचि वाजती कडकडा बाजेंहि नानापरी
नृत्यें होति पुढें मुखें जय जन प्रोच्चस्वरानें करी
मोठयानें बहु भालदार दवलज्जादाहि लल्कारिती
शिंदे घेउनि मोरचेल फडकेही मस्तकीं वारिती ॥ १९ ॥
पाठीशीं तलवार ढाल धरुनी होती अघाडी किती
मोठे शूर शिपायि पायदळ हें, घोडे किती ठाकिती
हत्ती रंगितशुंड होत, हवदे, ह्या चालती सांडणी
स्वारी फार सुरेख होय जशि कां चित्रांतली मांडणी ॥ २० ॥
चाले फौज सहस्त्रशां अरबही हे क्रूर खांद्यावरी
बंदूकी धरुनी मुखें किल किला गोंगाटती, चाकरी
मध्यें फार हुशार, बार करिती, संचार मुंगीसही
नाहीं, वर्णिति भाट, थाट जमली स्वारी, दणाणे मही ॥ २१ ॥
बंदूका बहु काडकाड सुटती तोफा दणाणा धुडूं
मोठे गर्जति घोटकावरि तसे उंठावरीही तुडुं

## रंगपंचमी.

हत्ती गर्जति अश्व ही सति जयोच्चार ध्वनी तुंबळ
एकाच्या दुसऱ्यास शब्द अइकूं येईचना अम्मळ ॥ २१ ॥
सोन्याचे कळस प्रदीप्त असती ज्याना रुप्याच्या अशा
अंबाऱ्या शिबिका कितीक असती दिव्यें विमानेच शा
मध्यें चंद्रचि नालखींत बसती श्रीमंत, तारागण
भोंताले सरदार चालति पहा हे मेदिनीभूषण ॥ २३ ॥
शिंद्यानीं बहु रंग त्याच दिवसीं केला असे केशरी
वस्त्रें आणिक भूषणेंहि वनिता घेवोने माडीवरी
बैसोनी झरक्यांतुनी सकुतुका स्वारी पहाती जशा
आनंदा बहु होत दिव्य रमणी त्या द्वारकेच्या जशा ॥ २४ ॥
अंबाऱ्यावरि रंग ते उडविती लावूनि वस्त्राप्रती
शिंदे आणि लहान थोर जनही नाहीं तयाला प्रती
बेवोनी पिचकारिया उडविती श्रीमंतही आपण
रंगाचे बहु पाट वाहाति भरे ओघें समस्तांपण ॥ २५ ॥
झाला रंगाचि रंग पाहाति जना स्वामी कृपादृष्टिनें
सारे लोक गुलालही उधळिती घेवोनिया मुष्टिनें
सारें लालचि लाल अभ्र दिसतें हें सांध्यरागें जणो
कीं पीतांबर दिग्वधू धरुनिया स्वामीस रक्ता ह्मणो ॥ २६ ॥
रस्त्यांमाजि बहूत होय गरदी नारीगवाक्षांतुनी
प्रेमानें प्रभुचा मुखेंदु बघती नेत्राप्रती लावुनी
आशी देउनि लिंबलोण करिती विष्णूच हा जन्मला
एसें बोलति वर्णितां कवि ह्मणे कीं एक जिव्हामला ॥ २७ ॥
बाहेरील समस्त रंग धुवुनी जातोच निश्रीक तो
श्रीरंगें मन रंगतांनच धुतां जाईच, तो राहतो
ऐसा रंग कशास, जो क्षण भरी राहेन, जातो लया
...यीं वश रंगनाथ असतां, तोटाच रंगासया ॥ २८ ॥
...ज्जिवरी कितीक रमणी माडीवरी बैसती

## रंगपंचमी.

घेवोनी पिचकारिया उडाविती रंग स्वहस्तें अति
धारा लोटति हस्तवृष्टिच जणो झालें गुलालें न भ
हे श्रीमंताचि पूर्ण चंद्र उदया येतांचि रक्तप्रभ ॥ २९ ॥

## साक्या,

रवि वारांतुनी बुधवारांतहि उतरे स्वारी मगती
झुकत झुकत मग शनिवारातिल आली वाड्यावरती ॥ ३० ॥
उतराति मग ते सवाइमाधवराव पालखींतुनया
करिती मुजरा मानकरी मग भरभर बहु वांकुनया ॥ ३१ ॥
डुलत डुलत हळु हळु पद टाकित येउनि गादी वरती
शिंदे, नाना फडणिस, हरिपंताय्या फडके बसती ॥ ३२ ॥
दवलत जादा निगारखो स्वर घडि घडि छडिधर करिती
श्रीमंत प्रभु अवताराचि हा महा विष्णुचा ह्मणती ॥ ३३ ॥
एक्या दिवसीं याच दिनीं शिवहिमगिरि सदनीं आले
मेना ह्मणते जावाई हे आलि बईल वाले ॥ ३४ ॥
एक्यां हातीं डमरू दुसऱ्या हातीं त्रिशूल धारिती
जटा शिरावरि विभूति अंगीं व्याघ्रांबर पांघरती ॥ ३५ ॥
सासू मेना भोजन घालुनि ह्मणते खेळा रंग
संगे उमेस घेउनि, राहो तुमचें प्रेम अभंग ॥ ३६ ॥
रंग उडविती उमा महेश्वर एकामेका वरती
रंगाची ते पिचकारीनें फाराचि वृष्टी करिती ॥ ३७ ॥
रंग उडविला पिचकारीनें प्रथम उमेनें भारी
घडि घडि गुलाल फेकुनि केला जेर बहू कामारी ॥ ३८ ॥
उमा सख्या बहु भूत गणावरि टाकिति रंग गुलाल
नाचति मृदंग वाजविती मृदु गाती धरिती ३(
खेळायाला रंग न येत्या शंभुस तो बहु

## रंगपंचमी.

त्रिशूल व्याघ्रांबर डमरूच्या कोण रक्षितो घोळा ॥ ४० ॥
इकडे गिरिजा सखी गतीवरि मृदंग वाजवि झंझं
तिकडे शंभू गडगड डमरूशंख वाजवी भंभं ॥ ४१ ॥
इकडुनि गिरिजा गुलाल फेकी शशिधर फेकी भस्म
इकडे झाडी चुनडी, तिकडे फडफड झाडी चर्म ॥ ४२ ॥
रंगाचा भडिमारचि केला इकडुनि, शंभु पाशी
रंगचि नाहीं, असतां जरितरि तो कां भस्मचि फाशी ॥ ४३ ॥
पाहुनि मेना सासू ह्मणते जावाई हें ध्यान
पाहुनि तहान भूकचि हरते, कन्या माझि निधान ॥ ४४ ॥
धनदा हे असतां भांडारावरि जटाच वाढवि कैसा
स्वछंदी हा हजामतीला जैसा न मिळे पैसा ॥ ४५ ॥
त्रिभुवन पतिही ह्मणवुनि, बैलचि वाहन अवडे याला
गजचर्मातें पांघरतो हा टाकुनि शालि दुशाला ॥ ४६ ॥
सुंदर मंदिर महाल सोडुनि मसुण वटींताची शयन
करितो, घोटा पिउनिंच राहे, लाल करोनी नयन ॥ ४७ ॥
नाव नसेनच लौकिक, याला ओळख व्यवहाराची
उदास असतो, गरज तिळभरी नाहीं संसाराची ॥ ४८ ॥
सकळें अपुलें घरचि पळीभरि पाणी घेउनि, पाला
देई भुवनाचि. उदास पण तरि केलें लग्न कशाला ॥ ४९ ॥
कानीं बाळी बुगडी न मिळे तरिही तृप्तचि कन्या
सुसती उपजुनि माझ्या पोटीं मजला ह्मणवी धन्या ॥ ५० ॥
पोर असे बहु अरसाल ह्मणुनिच हाचे पति, सुख घेती
दुसरी कोणी असती तर मग धुडके उडवुनि देती ॥ ५१ ॥
[illegible]हिभूषण जो सर्पांचे धरि, तो हिनळा देइल काय
[illegible] रंग [illegible]
[illegible]चें [illegible] अचि [illegible]र्पांचे विष जो खाय ॥ ५२ ॥
[illegible]ंगीं वश रंग[illegible] असतां,
[illegible]गिवरी कितीक रमणी, [illegible] नईलाचि ज्याचें

## रंगपंचमी,

हे तुसे जोगें वस्त्र मागतां पाठावू गज चर्म
दावी रंगा मधेंच केलें प्रकटाचे विलासवर्म ॥ ९४
रंग पुरेकर बाई चलगे चतुर असे बहुनवरा
उगाच न दसे, नारद, फिरतो गरगर जैसा भवरा ॥ ९५ ॥
निर्गुण असतां वर, गुण वर्णुनि स्वार्थचि साधुनि गेला
वेड्या हातीं गोवुनि कन्या आपण अलगचि मेला ॥ ९६ ॥
नको नकोगे ऐसें बोलूं आई, ह्मणते आर्या
तपःप्रभावें करुनिच झाल्यें मीच महेश्वरभार्या ॥ ९७ ॥
निजरंगीं जो रंगुनि राहे त्याला प्राकृत रंग
कैचातरि तो भक्त रंजनीं देतो सदाहि अंग ॥ ९८ ॥

**समाप्त.**

इमख

गुल

चैं रंग क

गीं वश रंगनाथ असतां,

ज्ञिवरी कितीक रमणी